weekly 15 Nov 2026_Layout 1 11/14/2026 11:14 PM Page 1

महाराष्ट्रातील निर्भिड साप्ताहिक

रविवार जगमित्र

Jagmitra2010@gmail.com ● मा.संपादक : कृष्णा कडबाने 7030908787 ● निवासी संपादक : मकरंद जाहागीरदार 9422216061, 9371591760 ● कार्यकारी संपादक : शेख बिलाल 9422404740 www.jagmitra.com

■ बीड (महाराष्ट्र) ■ वर्ष ०१ ले ■ अंक ५४ ■ रविवार दि.१५ नोव्हेंबर २०२६ ■ PRGI.No.MHMAR/25/A3358 ■ पाने ६ ■ किंमत : ३ रु.

भंगारात गेलेल्या संचांचा ५५ वा वर्धापन दिन; शासनाच्या तिजोरीवर अधिकाऱ्यांचा दरोडा!

बळीराजा दुष्काळाने होरपळतोय, अन् वीज केंद्राचे अधिकारी भूतकाळाचा उत्सव साजरा करताहेत!

मशिनरी भंगारात, संच २०१४ पासून बंद; मग वर्धापन दिनाची उधळपट्टी कोणाच्या फायद्यासाठी?

शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ; अस्तित्वात नसलेल्या वीज केंद्राचा वर्धापन दिन म्हणजे सरकारी पैशांची लूट!

निधी लाटण्याचा नवा फंडा? भंगारातील प्रकल्पाचा वर्धापन दिन साजरा करण्याचा निर्लज्जपणा!

शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार

एकेकाळी या केंद्रासाठी जवळच्या वाण धरणाचे पाणी राखीव होते, नंतर २२ कि.मी. वरील खडका बंधाऱ्याचे पाणी वापरले जाऊ लागले. मात्र, पाण्याअभावी २०१४ मध्ये हे जुने संच बंद पडले. आज पुन्हा संपूर्ण बीड जिल्हा भीषण दुष्काळाचा सामना करत आहे. बळीराजा पाण्याअभावी आणि नापिकीमुळे मेटाकुटीला आला असताना, दुसरीकडे वीज केंद्राचे अधिकारी आणि कर्मचारी बंद पडलेल्या प्रकल्पाचा वर्धापनदिन साजरा करण्याच्या नावाखाली लाखों रूपयांची उधळपट्टी करून शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळत आहेत.

निधी लाटण्याचा उद्योग?

वर्धापन दिनाच्या नावाखाली लाखों रुपयांचे बोगस बिल काढून शासकीय निधीची लूट करण्याचा हा प्रकार असल्याची चर्चा दबक्या आवाजात सुरू आहे. ज्या प्रकल्प-तून एक युनिटही वीज तयार होत नाही आणि ज्याची यंत्रणा केव्हाच इतिहासजमा झाली आहे, त्याचा वर्धापन दिन साजरा करणे हा निव्वळ निर्लज्जपणाचा कळस आहे. प्रशासनाने हा दिखाऊपणा आणि पैशांची उधळपट्टी तात्काळ थांबवावी, अन्यथा तीव्र जनआंदोलन छेडले जाईल, असा इशारा नागरिक व शेतकरी वर्गातून दिला जात आहे.

परळी औष्णिक विद्युत केंद्राचा आज ५५ वा वर्धापन दिन; महानिर्मितीचे अध्यक्ष राधाकृष्णन बी. यांची प्रमुख उपस्थिती!

मुख्य अभियंता सुनील इंगळे यांची माहिती; शक्तीकुंज वसाहतीत सायंकाळी ७ वाजता दिमाखदार सोहळा

परळी वै./जगमित्र न्यूज

बीड जिल्हा दुष्काळाने होरपळतोय. शेतकऱ्याच्या डोळ्यात पाणी नाही, शेतात पीक नाही, जनावरांना चारा नाही, पिण्याला पाणी नाही. बळीराजा आत्महत्येच्या उंबरठ्यावर उभा आहे. आणि अशा वेळी परळी औष्णिक विद्युत केंद्राचे अधिकारी मात्र वर्धापन दिनाच्या नावाखाली सरकारी पैशांवर ताव मारायला निघाले आहेत! बीड जिल्हा सध्या भयंकर दुष्काळाच्या खाईत लोटला गेला असून शेतकरी हवालदिल झाला आहे. अशा आणीबाणीच्या परिस्थितीत, २०१४ मध्येच पूर्णपणे बंद पडलेल्या जुन्या परळी औष्णिक विद्युत निर्मिती केंद्राचा ५५ वा वर्धापन दिन रविवार, दि. १५ नोव्हेंबर २०२६ रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्याचा अजब घाट प्रशासनाने घातला आहे. मुख्य अभियंता सुनील इंगळे यांनी या उत्सवाची घोषणा केली असली तरी, अस्तित्वातच नसलेल्या जुन्या प्रकल्पाचा वर्धापन दिन साजरा करून अधिकाऱ्यांनी स्वतः च्या आर्थिक फायद्यासाठी शासनाच्या तिजोरीवर लाखोंचा दरोडा घालण्याचा डाव आखल्याचा संतप्त आरोप परळीकरांकडून होत आहे.परळी औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रातील जुने १, २, ३, ४ आणि ५ नंबरचे संच २०१३-१४ मध्येच तीव्र पाणीटंचाईमुळे आणि तांत्रिक कारणांमुळे पूर्णपणे बंद पडले होते.

आजघडीला या जुन्या केंद्राच्या जागेवर ना एकही मशीन शिल्लक आहे, ना कसलीही यंत्रणा. येथील सर्व मशिनरी भंगारात विकली गेल्याची जोरदार चर्चा परळी शहरात सुरू आहे. सध्या केवळ ७५० मेगावॅट क्षमतेचे ६, ७ आणि ८ क्रमांकाचे नवे संच सुरू आहेत. असे असताना, ज्या जुन्या संचांचे नामोनिशाणही उरलेले नाही, त्यांचा ५५ वा वर्धापन दिन साजरा करण्याचे नाटक नेमके कशासाठी रचले जात आहे? असा सवाल उपस्थित होत आहे.

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

मराठवाड्याच्या औद्योगिक आणि ऊर्जा विकासात मोलाचे योगदान देणाऱ्या परळी औष्णिक विद्युत निर्मिती केंद्राचा ५५ वा वर्धापन दिन आज, रविवार दि. १५ नोव्हेंबर २०२६ रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. या वर्धापन दिन सोहळ्यास महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.) यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असल्याची माहिती केंद्राचे मुख्य अभियंता सुनील इंगळे यांनी दिली. परळी औष्णिक विद्युत केंद्राच्या ५५ वर्षांच्या गौरवशाली वाटचालीचा आढावा घेणारा हा सोहळा शक्तीकुंज वसाहत येथे सायंकाळी ७ वाजता आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाला महानिर्मितीचे संचालक (स्वतंत्र) विश्वास पाठक, संचालक अभय हरणे, संचालक (वित्त) मनेष वाघीस्कर, संचालक (प्रकल्प) राजेश पाटील आणि संचालक (इंधन) विजय राठोड यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

मान्यवरांची मांदियाळी; महानिर्मितीचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार!

या सोहळ्यास विशेष निमंत्रित म्हणून संचालक पंकज सपाटे, नितीन चांदुरकर, विवेक रोकडे, कार्यकारी संचालक डॉ. नितीन वाघ, धनाजी तोरस्कर, संचालक गिरीश कुमस्वार, कार्यकारी संचालक (सौर व अपारंपरिक ऊर्जा) तसेच ऊर्जा व प्रकल्प विभागाचा अतिरिक्त कार्यभार सांभाळणारे अधिकारी, प्रभारी कार्यकारी संचालक (प्रकल्प) विलास मोटघरे, कार्यकारी संचालक (सं.व.सु.-२) आदी



मान्यवर उपस्थित राहणार आहेत.


दोन दिवसांपासून विविध उपक्रम; आज मुख्य सोहळ्याची रंगत!

वर्धापन दिनानिमित्त गेल्या दोन दिवसांपासून महानिर्मिती परिवारातील अधिकारी, कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी विविध मनोरंजनात्मक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांमुळे महानिर्मिती परिवारात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, आज सायंकाळी होणाऱ्या मुख्य सोहळ्याची सर्वांनाच उत्सुकता लागली आहे. ५५ वर्षांची ऊर्जा क्षेत्रातील वाटचाल, हजारो हातांचे योगदान आणि परळीच्या औद्योगिक ओळखीचा मानबिंदू ठरलेल्या या विद्युत केंद्राचा वर्धापन दिन उत्साहात साजरा होणार आहे. या सोहळ्यास महानिर्मिती परिवारातील सर्व अधिकारी, अभियंते, तंत्रज्ञ, कर्मचारी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उप-स्थित राहावे, असे आवाहन मुख्य अभियंता सुनील इंगळे, उपमुख्य अभियंता महेश महाजन, प्रभारी उपमुख्य अभियंता एस. एम. बुकतारे, अधीक्षक अभियंता एच. के. अवचार, वरिष्ठ व्यवस्थापक डार्विन फुल्लके, सहाय्यक कल्याण अधिकारी शरद राठोड यांच्यासह अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केले आहे.

सावकाराच्या त्रासाला कंटाळून बीड येथील तरुणाची आत्महत्या, गुन्हा दाखल!

जालना/बीड : खासगी सावकारांचा सततचा त्रास, धमक्यांना कंटाळून आणि मानसिक त्रास देत असल्यामुळे बीड येथील एका तरुणाने टोकाचे पाऊल उचलत आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. राहुल तानाजी करवंदे असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव असून, त्याने आत्महत्येपूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीत (सुसाईड नोट) सावकारांची नावे लिहून गळफास घेत आपली जीवनयात्रा संपवली. याप्रकरणी दोन सावकारांवर तालुका ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बीड शहरातील भोईगल्लीत राहणारा राहुल तानाजी करवंदे हा मागील तीन वर्षांपासून गोलापांगरी (ता. जालना) येथे बहिणीच्या घरी राहत होता. तीन वर्षांपूर्वी त्याने सावकार गोकुळ ऊर्फ कृष्णा गोरख



काजळे,आणि लखन गोरख काजळे राहणार भोई गल्ली, पेठ बीड, यांच्याकडून ६०,००० रुपये व्याजाने घेतले होते. या रकमेपोटी मुद्दल आणि सव्वा लाखांवर व्याज दिले. पैसे फेडूनही सावकारांनी राहुलला आणि त्याच्या कुटुंबीयांना सतत दमदाटी सुरू ठेवली. २४ ऑक्टोबर रोजी दोन्ही संशयितांनी राहुलच्या घरी जाऊन आणखी ५० हजार रुपयांची मागणी केली. विरोध केल्यास राहुलच्या आईच्या गळ्यातील सोन्याची पोत, ३ हजार रुपये रोख व गॅस टाकी हडपून मारहाण केली. पोलिसांत तक्रार दिल्यास जीवे मारण्याची धमकीही देण्यात आली. मानसिक व शारीरिक त्रासाला कंटाळून राहुलने ११ नोव्हेंबर रोजी दुपारी गोलापांगरी येथे सावकारांच्या नावांची सुसाईड नोट लिहून गळफास घेत आत्महत्या केली. याप्रकरणी मृताचा भाऊ राजेश तानाजी करवंदे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दोघांवर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

राहुल हा आपल्या कुटुंबातील कर्ता पुरुष होता. आईची जबाबदारी त्याच्यावर होती. मात्र, या घटनेने कुटुंबाचा आधारच हिरावला गेला आहे. खाजगी सावकारांना माणसं मारण्याचे लायसन दिले आहे का?

कथित सावकाराकडे लायसन असल्याचेही तो सांगत असतो पोलिसांनी त्याची सुद्धा चौकशी करायला हवी कोणाचे लायसन वापरून हे दमदाटी केली जाते?

संबधित सावकाराची आर्थिक व्यवहारांची चौकशी, पूर्वीच्या गुन्ह्यांची पडताळणी, आत्महत्येपूर्वीच्या चिठ्ठीचा तपास आणि पीडित कुटुंबाच्या सुरक्षेची खात्री करणे आवश्यक आहे. (पान २ वर)


धारूर घाटात खडी क्रशरचालकांची मनमानी; अवैध रस्त्यांमुळे अपघातांना निमंत्रण!

करळ वळणावर मालवाहतुकीसाठी घाटाच्या मधोमध रस्ता; प्रशासन मोठ्या दुर्घटनेची वाट पाहत आहे का?

धारूर/अतूल शिनगारे

खामगाव-पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ सी वरील धारूर घाटात अपघातांची मालिका सुरू असतानाच खडी क्रशरचालकांकडून मनमानी पद्धतीने अवैध रस्ते तयार करण्यात येत असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. करळ वळणाजवळ घाटाच्या मधोमध खडी क्रशरवरील ओव्हरलोड मालवाहतुकीसाठी तयार करण्यात आलेले हे रस्ते प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी धोकादायक ठरत असून अपघातांना निमंत्रण देत आहेत. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे वाहनचालकांमधून संताप व्यक्त होत आहे.

राष्ट्रीय महामार्गाची निर्मिती झाल्यानंतर या मार्गावरील वाहतूक मोठ्या प्रमाणात वाढली आहे.



मात्र, धुनकवड पाटी ते धारूर या सुमारे ११ किलोमीटर रस्त्याचे रुंदीकरण अद्याप झालेले नाही. याच मार्गावर तीन किलोमीटरचा अरुंद व अवघड वळणांचा घाट असल्याने यापूर्वी अनेक भीषण अपघात (पान २ वर)

माजलगावचे ग्रामीण पोलीस वसुलीभाई?

टपरी तिथे गुटखा हॉटेल तेथे मटका

..म्हणे आम्ही नाही त्यातले आणि कडी लावा आतली!

पी आय विजय रामोड पात्रुड येथील काळ्या छत्रछायेत अवैध धंद्यांची ऐशो आरामात भरारी!

गुटखा तस्कर बाबूचा माझ उतरण्याची पोलीसामध्ये हिंमत आहे का ?



माजलगाव/बाळासाहेब आडागळे

माजलगाव ग्रामीण पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक विजय रामोड यांनी पदभार घेतल्यापासून अवैध धंद्यावाल्यासाठी मोकळे रान झाले असून भर अब्दुला डाल गुड थैली मैं. असे म्हणत अक्षरशः पिशवी सांडे पर्यंत हप्त्यासाठी ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस वसुली च्या कमाईत लागून खाकीची अब्रू वेशीला टाकली असल्याची बोलले जात आहे.

ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत पात्रुड येथे गुटखा मटका दारू नावाचा अवैध जुगार व्यवसाय अक्षरशः बहरला आहे. जागो जागी , चहाच्या टपरीपासून गल्लिबोळापर्यंत गुटखा मटका धंदा फुलला असून, दररोज लाखोंची उलाढाल होत असल्याची चर्चा आहे. मात्र पात्रुड येथील बाबू नामक व्यक्तीची गुटखा तस्करी एवढी जोमात चालली असून बाबू चा माज उतरण्याची पोलिसांमध्ये हिम्मत आहे का ? असा प्रश्न उपस्थित होत आहे. इतक्या मोठ्या प्रमाणावर अवैध धंदा सुरू असतानाही पोलिसांकडून कोणतीही ठोस कारवाई होत नाही, हे विशेष लक्षवेधी आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, ठाण्याचे प्रमुख पोलीस निरीक्षक विजय रामोड यांच्या काळ्या छत्रछायेत हा धंदा बिर्धास्तपणे सुरू आहे. माजलगाव ग्रामीण पोलीस म्हणजे आम्ही नाही त्यातले आणि कडी लावा आतली असा टोला नागरिक देत आहेत. कारण, पात्रुड ठिकाणी गुटखा मटका सुरू असताना आम्हाला माहिती नाही असे सांगणारे पोलीस म्हणजे नागरिकांच्या बुद्धीची थट्टा करत आहेत, असे लोक सर्रास बोलू लागले आहेत.

दररोज लाखोंचा खेळ चालू असताना पोलीस प्रशासनाचे मौन म्हणजे संरक्षणाच्या नावाखाली लुटमार, अशी कुजबुज सुरू आहे. काही ठिकाणी मटका चाल-वणाऱ्यांकडून थेट हप्ते पोलिसांपर्यंत पोहोचतात, तर काही ठिकाणी पोलीसच वसुली गोळा करत फिरतात, अशी धक्कादायक माहिती समोर येत आहे.

गावातील युवक, शेतकरी, कामगार वर्ग या अवैध गुटखा मटक्याच्या जाळ्यात अडकत चालला आहे. दिवसागणिक कर्जात बुडणाऱ्या या लोकांचे आयुष्य उद्ध्वस्त होत असताना प्रशासन मात्र शांत बसले आहे. त्यामुळे नागरिकांत तीव्र संताप आहे.


कायद्याचे रक्षण करणारे लोकच जर गुटखा मटक्याचे राखणदार झाले तर, सामान्य जनतेने कोणाकडे न्याय मागायचा? असा सरळ प्रश्न आता नागरिकांकडून उप-स्थित होत आहे. (पान २ वर)

माजलगाव-तेलगाव रस्त्याचे २७ कोटींचे टेंडर रद्द!

श्रेयवाद की टक्केवारीचा वाद? विकासकामांच्या राजकारणात जनतेचा जीव मात्र टांगणीला!

माजलगाव/बाळासाहेब आडागळे

माजलगावतेलगाव रस्त्याच्या विकासासाठी मंजूर असलेले २७ कोटी रुपयांचे टेंडर रद्द झाल्याची माहिती आमदार प्रकाशदादा सोळंके यांनी दिल्याचे समोर आले आहे. मात्र, हे टेंडर नेमके कोणत्या कारणामुळे रद्द झाले? तांत्रिक अडचणी, प्रशासकीय त्रुटी की राजकीय श्रेयवाद? याचा खुलासा जनतेसमोर होणे आवश्यक आहे.



रस्त्याच्या कामाचे श्रेय नेमके कुणी घ्यायचे, यावरून राजकीय वर्तुळात सुरू असलेल्या संघर्षात विकासकामच अडकल्याची चर्चा आहे. मात्र, २७ कोटींचे टेंडर रद्द करण्यामागील अधिकृत कारण काय, याची माहिती आमदार प्रकाशदादा सोळंके यांनी जनतेला देणे गरजेचे आहे.

मोहनदादा जगतापांचा रस्ता रोको; मग स्वतःच्या पक्षातील गुत्तेदारांच्या कामाचे काय?

रस्त्याच्या दुरवस्थेविरोधात मोहनदादा जगताप यांनी रस्ता रोको आंदोलन केले. मात्र, त्यांच्या पक्षातील गुत्तेदारांना याच कामाचे टेंडर मिळाले होते, तर प्रत्यक्ष काम सुरू का झाले नाही? संबंधित टेंडरची प्रक्रिया नेमकी कुठे अडली? काम न होण्यामागचे कारण काय? या प्रश्नांची उत्तरे मोहनदादा जगताप यांनीही जनतेसमोर मांडावीत.

दुसऱ्यांना जाब विचारताना स्वतःच्या पक्षातील ठेकेदारांच्या कामाची जबाबदारी कोण घेणार? केवळ (पान २ वर)

माथाडी कंत्राटदाराची मुजोरी की प्रशासनाची लाचारी?

शिराढोण प्राथमिक आरोग्य केंद्राच्या स्थलांतराचा खेळखंडोबा!

शिराढोण/बिलाल कुरेशी

मागील ७ वर्षांपासून जनावरांच्या दवाखान्यात जीव मुठीत धरून सुरू असलेल्या शिराढोण (ता. कळंब) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे (झक्ष) स्थलांतर अखेर कागदावरच राहिले असून, आज प्रत्यक्षात प्रशासकीय यंत्रणा गाव गाड्यात असताना एका मूकबधिर व मुजोर कंत्राटदारासमोर जिल्हा प्रशासन पूर्णपणे हतबल आणि लाचार झाल्याचे उघडकीस आले आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या स्पष्ट आदेशाला खुंटीला टांगून कंत्राटदाराने नवीन इमारतीमधील १० खोल्यांना कुलूप ठोकले असून, थेट प्रशासनालाच आव्हान दिल्यामुळे ग्रामस्थांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

काय आहे प्रकरण?

शिराढोण येथील प्राथमिक आरोग्य केंद्र अत्यंत जीर्ण व धोकादायक इमारतीत सुरू असल्याने गरोदर माता, नवजात बालके यांच्या मूलभूत हक्कांचे (अनुच्छेद २१) हनन होत आहे. याप्रकरणी ॲड. अमोल रामराजे माकोडे यांनी आगामी १६ नोव्हेंबर २०२६ रोजी आमरण मा. विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजी नगर यांच्या परिसरात अमरण उपोषणाचा इशारा दिला होता. या तीव्र दबावानंतर, मा. जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांच्या अध्यक्षतेखाली १२ नोव्हेंबर २०२६ रोजी तातडीची बैठक पार पडली. या बैठकीत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक, कार्यकारी अभियंता (पान २ वर)

page 2_Layout 1 11/14/2026 11:34 PM Page 1

आळंदी नगरपरिषद समोर तरुणावर कोयत्याने वार आळंदी शहरात दहशत पोलीस प्रशासन डोळे झाक

आळंदी/प्रतिनिधी

आळंदी नगरपालिकेच्या टाऊन हॉल इमारतीच्या प्रवेशद्वारावर शुक्रवारी (दि.१३) सकाळी साडेदहाच्या सुमारास एका तरुणावर खंजिराने वार करण्यात आले. सदर घटनेचा व्हिडीओदेखील व्हायरल झाल्याने शहरात भीतीचे वातावरण पसरले.

सागर दत्तात्रय बडे (वय २२, रा. आण्णा भाऊ साठे नगर, घाटे कॉलनी, देहू फाटा, दिघी) असे हल्ला झालेल्या तरुणाचे नाव असून तो रिक्षा-चालक आहे. आर्यन नागोराव पंडित (रा. केळगाव) व त्याच्यासोबत असलेल्या अन्य दोन जणांनी त्याच्यावर वार केले. यात बडे गंभीर जखमी झाला असून, त्याला उपचारासाठी पिंपरी येथील यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

आळंदी पोलिस ठाण्याच्या पथकाने आरोपींचा शोध सुरू केला आहे. दरम्यान, सदर घटनेमुळे आळंदीतील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. दिवसाढवळ्या भर चौकात आणि शासकीय इमारतीसमोर हल्ला होत असेल तर शहरात कसली कायदा व सुव्यवस्था आहे,तसेच आळंदी पोलीस पिएमपिएल बस स्थानक समोर पोलीस कर्मचारी डियूटी असायला पाहिजे तसेच आळंदी शहरात बरेच गुंड प्रवृत्तीचे टोळी बुलेट फिरतात त्यावेळी आळंदी पोलीस स्टेशन कोणत्याही प्रकारची कारवाई करत नाही त्यामुळे आणखी बळ मिळाले आहे अशी चर्चा आहे.

महाराष्ट्रातील निर्भीड दैनिक जगमित्र विशेष संपादकीय

परंपरेचा धूर!

अजिबात पाळले जाणार नाहीत असे आदेश देण्याचे आणि त्या आदेशांचे उल्लंघन होताना त्याकडे मसुख दु:खे समे कृत्वा:फवृत्तीने तटस्थपणे पाहण्याचे आपल्या न्यायपालिकेचे औदार्य वादातीत खरेच. या उच्च कोटीच्या न्यायालयीन उदारमतवादासमोर नतमस्तक होऊन दीपावलीचा आनंद द्विगुणित अथवा त्रिगुणित करणाऱ्या आगीच्या घटनांवर आपण त्याच निर्विकारपणे भाष्य करू या. त्याआधी न्यायपालिकेचे आभार आभार मानावे तितके कमीच. ते मसव्वासो क्रोरफ (की एकसोचालीस क्रोर?) भारतीयांस इतक्या सुलभपणे निष्काम कर्मयोगाचे धडे आपली न्यायपालिका घालून देते यासाठी. आदेश देणे हे न्यायपालिकेचे कर्तव्य. ते पार पाडल्यानंतर या आदेशाची अंमलबजावणी होते किंवा कसे यात लक्ष घालणे म्हणजे पोर जन्मास घातले म्हणून त्यावर आयुष्यभर मालकी सांगत राहणे. हे न्यायपालिकेस उमगते. म्हणून न्यायपालिका आपल्या आदेशांकडे गंगेत सोडल्या जाणाऱ्या दिव्यांकडे ते सोडणाऱ्याने पाहावे तसे पाहाते. दिवा लावला, गंगार्पणमस्तु म्हणत तो पाण्यात सोडला की झाले. आता त्याचे काय होणार या विचारात जीव गुंतवायचा नाही हा उदात्त विचार आपल्या न्यायालयीन आदेशात हमखास दिसतो. गणेशमूर्ती प्लास्टर ऑफ पॅरिसच्या नकोत, शाडूच्या मातीच्या हव्यात असा आदेश द्यावयाचा. पण गणेशागमनाआधीच त्या आदेशाचे विसर्जन होताना पाहायचे. गणेशमूर्तींच्या उंचीबाबत काहीबाही नियम घालून द्यायचा. मग त्याच नियमांची पायमल्ली होताना पाहात गगनभेदी मूर्तीसमोर नतमस्तक व्हायचे. दिवाळीत कानठळी आवाजाच्या फटाक्यांवर बंदी असे बजावायचे आणि मग त्या बंदीच्या चिंधड्या होत असतानाचा दणदणाट कानात बोटे घालून सहन करायचाः हे अंत:करण विशाल असल्याखेरीज अजिबात शक्य नाही. म्हणून अशा स्थितप्रज्ञतेचा धडा देशवासीयांस घालून देणाऱ्या न्यायपालिकेचे आभार मानून दीपोत्सवाच्या आनंद समीक्षेकडे वळू या. यंदाचा दीपोत्सव खास खरा. अमेरिकेत भारत-मित्र डोनाल्ड ट्रम्प यांच्या वा दुसरे भारत-मित्र इस्रायलचे पंतप्रधान नरसंहारी नेतान्याहू यांच्या कापल्या गेलेल्या नाकांमुळे असेल बहुधा; यंदा भारतवर्षातील दीपावलीत जनसामान्यांचा आनंद गगनात मावत नव्हता. पूर्वी राजे-महाराजे आनंदाच्या प्रसंगी भांड्याचे आवाज (पक्षी: तोफा उडवत) वा शोभेच्या दारूची आतषबाजी करीत. कालौघात राजेशाही गेली. लोकशाही आली. या लोकशाहीत नागरिकांस राजा (पाहा : मतदारराजा, ग्राहक राजा, बळीराजा इत्यादी) म्हटले जाते. ते खरे मानल्याने पूर्वीच्या राजेरजवाड्यांची आनंदोत्सवाची सवय या लोकशाहीतील राजा म्हणवून घेणाऱ्या नागरिकांत उतरली. म्हणून वाढदिवस असो की घरात कोणाचे शुभमंगलः इतरांस कानठळ्या बसवणारा फटाक्यांचा दणदणाट हवाच हवा. दळणवळणाच्या साधनांचा कितीही विकास होऊन शुभवर्तमान इतरांस कळविण्यासाठी नवनवी आयुधे विकसित होवोत. राजेमहाराजांची दवंडीची, तोफांचा बार उडवण्याची परंपरा कायम टिकायला हवी. हीच बाब आतषबाजीसही लागू होते. पूर्वी राजेमहाराजांच्या काळी रात्री अंधार असे. पलिते वा मेणबत्यांचा प्रकाश पडून पडून पडणार किती? आणि कुठवर? म्हणून समस्त नगरवासीयांस काही शुभवार्ता कळवण्याच्या उद्देशाने आतषबाजी केली जात असे. काळ बदलला. आता प्रकाशाचे कितीही झोत सोडले तरी अंधार शोधू म्हणता सापडणार नाही, अशी स्थिती. त्यामुळे सांप्रती आतषबाजी ही कल्पनाच निरर्थक. काळ्याकुट्ट आकाशात, अमावस्येच्या पूर्वसंध्येस मिणमिणत्या तारकांच्या पार्श्वभूमीवर आणि जमिनीवरही तशाच मिणमिणत्या पणत्यांच्या सान्निध्यात आतषबाजीने उजळणारे आकाश वेगळाच आनंद देते, हे खरे. आता सतत-अतिप्रकाशी आकाशाने तो आनंद हिरावला त्यासही काळ लोटला. पण परंपरेचा आदर करायलाच हवा. त्यासाठी मग अतिउजळत्या आकाशात अतिअतिउजळते अग्निदिवे, अग्निबाण सोडायलाच हवेत. त्याच परंपरेचे पालन भावी महासत्तेतील जनता करीत असेल तर तिला दोष का बरे द्यावा? आणि ही परंपरा तोडण्याचा आदेश जर मुंबई महापालिका देत असेल तर त्या आदेशाचे पालन तरी का बरे व्हावे? भले अनेक इमारतींस आगी लागू देत. त्या आगी विझवताना अग्निशमन दल-ातील कर्मचाऱ्यांची त्रेधातिरपीट उडू दे. त्यांची कमतरता भासू दे. अग्निशमन केंद्रासाठी आरक्षित जागेवर टोलेजंग इमारती उभ्या राहून त्याच इमारती पेटू देत. ती विझवण्यासाठी आवश्यक शिड्या, पाणी आणि मुख्य म्हणजे प्रशस्त मार्गही अग्निशमन दलाच्या वाहनांस नसू दे. पण दिवाळीची आतषबाजीची परंपरा सुरू राहायला हवी म्हणजे हवीच. पूर्वी उंच इमारती अशा नव्हत्याच. चाळी वा दोन-तीन मजली इमारती. त्यामुळे अग्निबाण त्यांच्या वर जाऊन फुटत. पण अग्निबाण कर्त्यांनी काळाची पावले ओळखली नाहीत. त्यामुळे आताशा अगदी शंभर-शंभर मजली इमारती गल्लीबोळांत उभ्या राहू लागल्या तरी अग्निबाणांचा जीव काही दोन-पाच मजल्यांवर जात नाही, हे कसे? देशाची उंच उंच होणारी प्रगती या अग्निबाण निर्मात्यांनी पाहिलेली नाही, हा अक्षम्य गुन्हाच. त्याचमुळे ते खुज्या उंचीचे फटाके तयार करत राहिले. यामागे चीनचा कावा असेल काय? कदाचित असेलही. कारण अन्य अनेक घटकांप्रमाणे आपले फटाके देखील चीन-निर्मित. ते त्यांच्यासारखेच बुटके. त्यांस भारतीयांची वाढती उंची कशी दिसणार? कदाचित यामागे चिनी कावाही असू शकेल. भारतास बुटके अग्निबाण पुरवून आगीच आगी लावून द्यायच्या असा चिनी विचार त्यामागे नसेल असे छातीठोकपणे सांगता येणे अवघड. काहीही असो. म्हणून आपल्या इमारतींची उंची पार करून जाऊ शकतील असे अग्निबाण, अग्निदिवे बनवण्यासाठी आपण आत्मनिर्भरता साध्य करायला हवी, हा यातील धडा. त्यासाठी ममाझी माती, माझा फटाकाफ ममाझी माती, माझा लक्ष्मीबारफ ममाझी माती, माझा बाणफ असे कार्यक्रम सरकारने द्यावेत. स्वदेशी धुराचा आनंद वेगळाच. जे जे स्वदेशी ते ते उत्तम. मग दवा असो वा दारू (फटाक्याची)! या स्वदेशी फटाक्यांच्या धुराने नागरिकांचे श्‍वास कोंडले, प्रदूषणाची पातळी मोजण्याच्या मर्यादा ओलांडून गेली आणि खोकल्याची साथ पसरून खोकून खोकून नागरिकांच्या छातीच्या पिंजऱ्यांचे खुळखुळे झाले तरी हरकत नाही. त्यासाठी वाटल्यास ममाझी माती; माझा धूरफ अशी घोषणा देता येईल. पण फटाक्यांच्या निर्मितीत आत्मनिर्भरता हवीच हवी. या फटाक्यांनी प्रदूषण होऊन नागरिकांत खोकल्याची साथ पसरल्यास देशी दारूवर (फटाक्यांची) देशी दवा पुरवण्यास आपले अनेक बाबा, बापू सज्ज आहेत. काळजी नसावी. प्रदूषण हे काय क्षणिक असते. पण परंपरा अनंत काळची असते. तिचा सन्मान ठेवायला हवा. आंग्ल विद्याविभूषित शास्त्रज्ञांस हे काही कळत नाही. ते आपले प्रदूषणाच्या नावे बोटे मोडतात. या प्रदूषणचिंतातुरांस उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी ठणकावले ते बरे झाले. प्रदूषणासाठी फटाक्यांस बोल लावणाऱ्यांच्या कानाखाली आदित्यनाथांनी योगिक फटाका फोडला. फटाक्यांविरोधात इतका बभ्रा ? त्यामुळे प्रदूषण वाढले तर त्याचा इतका बाऊ ? प्रदूषणच ते; होईल दूरफफ्हा त्यांचा योगिक सल्ला देशवासीयांनी शिरसावंद्य मानायला हवा. त्याची दखल देशाची न्यायपालिकेनेही घ्यायला हवी. तसे झाल्यास उगाच प्रदूषण कमी करण्यासाठी न पाळले जाणारे आदेश जारी करण्याच्या निष्काम कर्मात न्यायपालिका वेळ दवडणार नाही. हा वेळ अन्य क्षेत्रात न पाळले जाणारे आदेश देण्यासाठी सत्कारणी लावता येईल. तेव्हा आगी लागोत वा अन्य उत्पात होव-ोत. फटाक्यांच्या उदात्त परंपरेचे अधिक जोमाने पालन करणे हे आपले कर्तव्य. या परंपरेच्या धुराने फुफ्फुसे निकामी होऊन प्राण गेले तरी बेहत्तर. परंपरा टिकणे महत्त्वाचे. माणसे काय अशीही मरणारच. परंपरा जिवंत राहायला हवी.

पान १ वरून...

पान १ वरून...

आत्महत्या

बीड जिल्ह्यात बेकायदेशीर खासगी सावकारीबाबत उप-स्थित होणारे प्रश्न आता गंभीर बनले आहेत. अवाजवी व्याजवसुली, धमक्या आणि कुटुंबीयांवर दबाव टाकण्याच्या तक्रारींकडे दुर्लक्ष! खासगी सावकारीच्या जाचामुळे तरुण आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलत असतील, तर अशा प्रकरणांचा गांभीर्याने तपास करून बेकायदेशीर सावकारीचे जाळे उद्ध्वस्त करण्यासाठी प्रशासनाने विशेष मोहीम राबवण्याची गरज आहे. पोलीस माझे काही करू शकत नाहीत' असे म्हणण्याचे धाडस कुणी करत असेल, तर कायदा सर्वांसाठी समान आहे, हे पोलीस प्रशासनाने निष्पक्ष कारवाईतून दाखवून द्यावे.

....

अपघातांना निमंत्रण!

झाले आहेत. या दुर्घटनांमध्ये अनेकांना जीव गमवावा लागला असून काही प्रवाशांना कायमचे अपंगत्व आले आहे.अशा परिस्थितीत घाटामध्ये अवैधरीत्या तयार केलेले रस्ते अपघातांचा धोका अधिक वाढवत आहेत. या रस्त्यांना परवानगी कोणी दिली? ओव्हरलोड वाहतुकीला कोणाचे अभय आहे? प्रशासन याची चौकशी करणार का? असे प्रश्न उपस्थित होत आहेत.मोठी दुर्घटना घडून जीवितहानी झाल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार का? संबंधित क्रशरचालकांची चौकशी करून अवैध रस्ते तातडीने बंद करावेत व दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी वाहनचालक व प्रवाशांतून होत आहे.

....

वसुलीभाई?

स्थानिक समाजसेवक आणि व्यापारी वर्गाने या वाढत्या अवैध धंद्यांविरोधात आवाज उठवण्याची मागणी केली असून, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तत्काळ चौकशी करून जबाबदारांवर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी आता होत आहे.

अन्याय सहन करायचा अवैध धंदे?

माजलगाव ग्रामीण पात्रुड परिसरात गुटखा अवैध मटका, दारू आणि जुगाराचे जाळे बिनदिक्कतपणे फोफावत चालले आहे. गल्लिबोळ, चहाच्या टपऱ्या, हॉटेलांच्या मागच्या खोलीपासून ते गावाच्या चौकापर्यंत सर्वत्र अवैध धंद्यांचे उघड साम्राज्य उभे राहिले आहे. दररोज लाखोंची उलाढाल, पैशांचा खेळ आणि स्थानिक तरुण पिढीचा नाश होत असताना, प्रशासन मात्र गप्प बसलेले दिसते. एवढी कायद्याची कडक अंमलबजावणी सांगणारे पोलीस, आता या धंद्यांवर पांघरूण घालून चिडीचूप बसल्याचा आरोप नागरिक करत आहेत. अवैध गुटखा दारू आणि मटका केंद्रे दिवसाढवळ्या सुरू असताना, पोलिसांकडून कोणतीही कारवाई न होणं म्हणजे संशयास्पद आहे.

पात्रुडमधील अवैध धंद्यांवर प्रश्न विचारताच पीआय रामोड म्हणाले, प्रत्यक्ष भेटा; आता कारवाई कधी?

पात्रुड येथे गुटखा, मटका आणि अवैध दारूचे धंदे खुलेआम सुरू असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. या अवैध धंद्यांबाबत माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विजय रामोड यांची प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी दूरध्वनीद्वारे संपर्क साधला असता, त्यांनी ''मी तुम्हाला याबाबत सविस्तर सर्व काही सांगतो, तुम्ही प्रत्यक्ष येऊन भेटा,'' असे सांगितले आणि त्यानंतर फोन कट केला.

मात्र पात्रुडमध्ये गुटखा तस्करी, मटका आणि अवैध दारूचे धंदे सुरू असल्याच्या तक्रारींकडे आता पोलीस प्रशासन नेमके कसे पाहते, हा प्रश्न उपस्थित होत आहे. संबंधित अवैध धंद्यांवर कारवाई झाली आहे का? गुटखा तस्करी करणाऱ्यांवर पोलिसांचा वचक आहे का? असे अनेक प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केले जात आहेत.

आता पोलीस निरीक्षक विजय रामोड प्रत्यक्ष भेटीत काय स्पष्टीकरण देतात आणि पात्रुडमधील अवैध धंद्यांविरोधात कोणती ठोस कारवाई करतात, याकडे नागरिकांसह सर्वांचे लक्ष लागले आहे.

पीआय साहेब, पत्रकारांचे मोबाईल नंबर ब्लॅकलिस्टमध्ये टाकून काय साध्य करणार?

सदरक्षणाय खलनिग्रहणाय या ब्रीदवाक्याचा विसर पडला काय?

माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विजय रामोड साहेब, लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेले पत्रकार हे जनतेच्या विविध समस्या, अवैध धंदे, कायदा-सुव्यवस्थेचे प्रश्न आणि प्रशासनातील त्रुटी याबाबत आपली प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी फोन करतात. मात्र पत्रकारांचे मोबाईल नंबर ब्लॅकलिस्टमध्ये टाकून नेमके काय साध्य करणार आहात? महाराष्ट्र पोलिसांचे ब्रीदवाक्य सदरक्षणाय खलनिग्रहणायम्हणजे सज्जनांचे रक्षण करणे आणि दुष्ट प्रवृत्तींचा नायनाट करणे. सर्वसामान्य नागरिकांचे संरक्षण करणे, गुन्हेगारी प्रवृत्तींना आळा घालणे आणि कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवणे ही पोलिसांची मूलभूत जबाबदारी आहे. मात्र या ब्रीदवाक्याचा विसर पीआय विजय रामोड यांना पडला आहे काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे. पत्रकार एखाद्या वैयक्तिक कामासाठी नव्हे, तर जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी आणि प्रशासनाची अधिकृत बाजू जाणून घेण्यासाठी संपर्क साधतात. पात्रुड परिसरातील गुटखा, मटका आणि अवैध दारूच्या धंद्यांबाबत प्रतिक्रिया मागणे हा पत्रकारांचा अधिकार आणि पत्रकारितेच्या कामाचा भाग आहे. अशा प्रश्नांना उत्तर देण्याऐवजी पत्रकारांचे फोन ब्लॅकलिस्टमध्ये टाकले जात असतील, तर ही बाब निश्चितच चिंताजनक आहे. पत्रकारांचे फोन ब्लॅकलिस्टमध्ये टाकून प्रश्न संपणार नाहीत, साहेब! जनतेच्या प्रश्नांची उत्तरे द्यावीच लागतील. पत्रकारांना टाळण्यापेक्षा अवैध धंद्यांवर कारवाई करून आपली कार्यतत्परता दाखवावी. पत्रकार आणि पोलीस प्रशासन यांच्यात संघर्ष नव्हे, तर जनहितासाठी समन्वय असणे अपेक्षित आहे.

संतोष रासवे

तालुकाध्यक्ष, महाराष्ट्र पत्रकार संघ

....

टेंडर रद्द!

आंदोलन करून प्रश्न सुटणार आहेत का, की प्रत्यक्ष रस्त्याचे काम पूर्ण करण्यासाठी पाठपुरावा करणार, असा सवाल नागरिकांमधून उपस्थित होत आहे.

ओमप्रकाश शेटे यांनी आणलेल्या निधीचे पुढे काय?

ओमप्रकाश शेटे यांनी रस्त्यासाठी मुख्यमंत्र्यांकडून निधी मंजूर करून आणल्याचे सांगितले जात आहे. मात्र, हा निधी प्रत्यक्ष मंजूर झाला का? प्रशासकीय मान्यता मिळाली का? टेंडर प्रक्रिया पूर्ण झाली का? निधी उपलब्ध असूनही काम सुरू झाले नसेल तर त्याची जबाबदारी कोणाची? याचा खुलासा त्यांनी करणे आवश्यक आहे.

रस्त्यावर आणखी किती बळी जाण्याची वाट पाहणार?

माजलगावतेलगाव रस्त्याची दुरवस्था आणि रखडलेले काम यामुळे प्रवाशांचा जीव धोक्यात आला आहे. राजकीय नेत्यांमध्ये श्रेयवादाची लढाई सुरू असताना सामान्य नागरिकांना मात्र खराब रस्त्यांवरून जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. अपघात आणि जीवितहानीचा धोका कायम असताना लोकप्रतिनिधी आणि प्रशासन नेमके कोणत्या मुहूर्ताची वाट पाहत आहेत?

जनतेचे प्रश्न अनुत्तरित; आता खुलासा हवाच!

२७ कोटींचे टेंडर रद्द होण्याचे अधिकृत कारण काय? श्रेयवादामुळे काम रखडले का? संबंधित ठेकेदारांनी काम का केले नाही? मुख्यमंत्र्यांकडून मंजूर निधीचे पुढे काय झाले? माजलगावतेलगाव रस्त्याचे प्रत्यक्ष काम सुरू कधी होणार? या प्रश्नांची उत्तरे जनतेला मिळालीच पाहिजेत. कारण रस्ता हा कोणत्याही राजकीय नेत्याच्या श्रेयाचा विषय नसून हजारो नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न आहे.

२७ कोटींच्या टेंडरमागे टक्केवारीचा खेळ?

राजकीय वर्तुळात खळबळजनक चर्चा; तो पुढारी नेमका कोण?

माजलगावतेलगाव रस्त्याचे २७ कोटींचे टेंडर रद्द होण्यामागे टक्केवारीचा कथित वाद कारणीभूत असल्याची चर्चा सध्या राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. टेंडर मिळविण्यापासून ते काम सुरू करण्यापर्यंत नेमका कोणाचा हस्तक्षेप होता? टक्केवारीच्या कथित वादातूनच विकासकामाला खीळ बसली का? या चर्चेमुळे राजकीय वर्तुळात अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. मात्र, या चर्चेला अद्याप अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. त्यामुळे संबंधित यंत्रणा आणि लोकप्रतिनिधींनी याबाबत वस्तुस्थिती स्पष्ट करावी. टेंडर रद्द होण्यामागील खरे कारण जनतेसमोर आणावे. टक्केवारीचा वाद खरा की राजकीय अफवा? २७ कोटींच्या टेंडरमागचा सूत्रधार कोण, हे जनतेला कळणार तरी कधी? श्रेयवाद थांबवा, टक्केवारीच्या चर्चेचा खुलासा करा आणि माजलगावतेलगाव रस्त्याचे काम तातडीने सुरू करा! जनतेला राजकारण नको, सुरक्षित रस्ता हवा!

....

लाचारी?

आणि जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या उपस्थितीत शिराढोण येथील नवीन ग्रामीण रुग्णालयाच्या इमारतीमधील १० खोल्यांमध्ये दोन दिवसांत तात्प-रत्या स्वरूपात झक्ठ स्थलांतरित करण्याचे सक्त आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले होते. या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी खुद्द जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी १३ नोव्हेंबर रोजी पत्रही काढले होते.

आज घडलेला घटनाक्रम व कंत्राटदाराची अरेरावी:

जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार आज तालुका आरोग्य अधिकारी (THO) आणि ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय पथक शिराढोण येथे रुग्णालयाचे आवश्यक साहित्य व औषधसाठा भरलेला ट्रक घेऊन दाखल झाले. सर्व ग्रामस्थ व प्रशासन स्थलांतराच्या प्रतीक्षेत असताना, कंत्राटदाराच्या प्रतिनिधीने जिल्हाधिकाऱ्यांनी आदेशित केलेल्या त्या १० खोल्याना कुलूप ठोकले आणि आपला मोबाईल फोन बंद करून फरार झाला. जेव्हा कंत्राटदाराशी व्हॉट्सॲपच्या माध्यमातून संपर्क साधून जिल्हाधिकाऱ्यांचा निर्णय व आदेशाची माहिती देण्यात आली, तेव्हा त्याने अत्यंत उद्धट आणि अरेरावीची भाषा वापरत सांगितले की, 'मी जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाने नाही, तर केवळ सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (PWD) पत्रानुसारच कुलूप उघडेन आणि जर कोणी आत प्रवेश करण्याचा प्रयत्न केला तर त्याच्यावर फौजदारी कारवाई करेन!'

जिल्हाधिकाऱ्यांपेक्षा कंत्राटदार मोठा?

एका बाजूला जिल्ह्याचे प्रथम नागरिक असणारे जिल्हाधिकारी आदेश काढतात, त्यांच्या आदेशानुसार सर्व यंत्रणा हालचाल करते, मात्र दुसरीकडे एक कंत्राटदार प्रशासनाचे आदेश धाब्यावर बसवून थेट फौजदारीची धमकी देतो, यामुळे 'जिल्ह्यात नेमकी प्रशासनाची हुकूमत चालते की या मुजोर कंत्राटदाराची?' असा संतप्त सवाल शिराढोणच्या नागरिकांकडून विचारला जात आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाची अशी खुली पायमल्ली होत असताना प्रशासन हतबल होऊन गुढघ्यावर बसल्याचे पाहून लोकशाहीचा हा उपहास असल्याची चर्चा सर्वत्र सुरू आहे. या लाचार आणि भ्रष्ट कारभाराविरुद्ध आता गावकऱ्यांचा व रुग्णांचा रोष अधिक तीव्र झाला असून, १६ नोव्हेंबर २०२६ रोजी होणाऱ्या उपोषणाची धार यामुळे अधिकच वाढण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत. प्रशासनाने या मुजोर कंत्राटदारावर तात्काळ शासकीय कामात अडथळा आणल्याचा गुन्हा दाखल करून बळकावलेल्या खोल्या ताब्यात घ्याव्यात, अशी आक्रमक मागणी शिराढोण परिसरातील नागरिकांमधून होत आहे.

'जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाच्या विरुद्ध जाऊन १० खोल्याना कुलूप लावून फरार होणारा कंत्राटदार प्रतिनिधी आणि शासकीय कामकाजात जाणीवपूर्वक अडथळा आणणारा कंत्राटदार हा प्रशासनाच्या लाचारीचा पुरावा आहे. प्रशासनाने कसलाही विलंब न करता या मुजोर कंत्राटदारावर तात्काळ शासकीय कामकाजात अडथळा आणल्यामुळे फौजदारी गुन्हा दाखल करावा आणि खुद्द मा. जिल्हाधिकारी व सार्वजनिक बांधकाम विभागाने (झथऊ) पुढे येऊन या १० खोल्यांचा ताबा घेत शिराढोणच्या नागरिकांच्या आरोग्याच्या मूलभूत हक्काचा मार्ग मोकळा करावा.'

-ॲड. अमोल रामराजे माकोडे.

शेवटच्या पानावरून...

शेवटच्या पानावरून...

आत्मदहन करणार

शासनाची फसवणूक या जागेवर समाज मंदिराचे बांधकाम काळे कुटुंबांना बेघर केले आहे. तसेच किसन उजन्या काळे व कौशल्या किसन काळे यांना कळंब शिवारातील रघुनाथ शंकरराव हारकर यांची गट नंबर ५१/इ/४ क्षेत्र ० हे ६० आर एवढी जमीन दादासाहेब गायकवाड स्वाभिमान सबलीकरण योजने अंतर्गत सोलापूर येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांच्यामार्फत त्या दोघा नवरा बायकोच्या नावे २०२२ मध्ये करण्यात आली आहे. ती जमीन मिळाल्यापासून तीन वर्ष तिची वहिवाट केली. मात्र, विनायक बळीराम माने यांनी गरीब बेकायदेशीर मार्गाचा अवलंब करून दांडगाव्याने अतिक्रमण करून काळे यांची जमीन स्वतः ताब्यात घेतली आहे. जमीन आणि प्लॉट काळे यांना देण्यात यावे या मागणीसाठी काळे कुटूंब जिल्हा प्रशासनाकडे गेल्या अनेक वर्षांपासून पाठपुरावा करत आहे. जिल्हा प्रशासनाला सोलापूर येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी यांनी सदरील जमीन व प्लॉट काळे कुटुंबांना देण्यात यावे असा जिल्हा प्रशासन व पोलीस प्रशासनाकडे पत्रव्यवहार केलेला आहे. मात्र, काळे यांच्या हक्काचा प्लॉट आणि हक्काची जमीन परत मिळवून देण्यास जिल्हा प्रशासन चालढकल करीत आहे. त्यामुळे किशन उजव्या काळे, कौशल्या किशन काळे व पारूबाई किशन काळे यांनी आम्हाला न्याय द्यावा अशी याचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे दि.५ ऑक्टोबर रोजी एका निवेदनाद्वारे केली आहे. जर न्याय मिळाला नाही तर दि.१५ नोव्हेंबर रोजी कुठेही करणार असल्याचा इशारा दिला आहे. मात्र, जिल्हा प्रशासनाने अद्यापपर्यंत कुठलीही कारवाई केली नसल्यामुळे किशन काळे, कौशल्या काळे व पारूबाई काळे हे आज आत्मदहन करण्याच्या मागणीवर ठाम आहेत.

....

सखोल पाहणी!

तडजोड न करणे, अशा स्पष्ट सूचना त्यांनी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिल्या.

जनसेवेचा ध्यास आणि विकासकामांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा!

नगरसेवक म्हणून केवळ नागरिकांच्या तक्रारी ऐकण्यापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी जाऊन परिस्थितीची पाहणी करणे, संबंधित यंत्रणेशी संवाद साधणे आणि मूलभूत सुविधांचा दर्जा उंचावण्यासाठी प्रयत्न करणे, ही सय्यद इलियास भाऊ यांच्या कार्यशैलीची विशेष ओळख आहे. पाणीपुरवठा सभापती म्हणून आपल्या कार्यकाळात उभारलेल्या महत्त्वपूर्ण प्रकल्पाच्या कामकाजावर आजही लक्ष ठेवत त्यांनी नागरिकांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. या पाहणी दौऱ्याप्रसंगी अत्तार फाऊंडेशन महाराष्ट्राचे संस्थापक अध्यक्ष इम्रान अत्तार, सरचिटणीस मोहम्मद रफीक अत्तार, मुस्लिम सेवा संघाचे प्रदेश महासचिव फिरदौस खान सर तसेच शेख जमील यांची प्रमुख उपस्थिती होती. सय्यद इलियास भाऊ यांच्या या पाहणी दौऱ्यामुळे जलशुद्धीकरण केंद्राच्या कामकाजाला अधिक शिस्त आणि गती मिळण्यास मदत होईल, तसेच बीडकरांना अधिक चांगल्या दर्जाचा पाणीपुरवठा मिळावा यासाठी सकारात्मक वातावरण निर्माण होईल, अशी अपेक्षा उपस्थित मान्यवरांसह नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

भ्रष्टाचार निर्मूलन समिती

अंतरावरील रुग्णालयांत जावे लागण्याची शक्यता निर्माण झाली होती.या गंभीर प्रश्नाची दखल घेत भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष इंजि. सादिक बाबामिया इनामदार यांनी मुख्यमंत्री, आरोग्यमंत्री, अपर मुख्य सचिव आणि आरोग्य आयुक्तांकडे निवेदनाद्वारे तक्रार केली होती. केंद्रे तातडीने सुरू न केल्यास संबंधित रुग्णालयांना टाळे ठोकण्याचा इशाराही त्यांनी दिला होता.या निवेदनाची दखल घेत जिल्हा शल्यचिकित्सक, बीड यांनी १३ नोव्हेंबर २०२६ रोजी अधिकृत पत्र काढून सहाही तालुक्यांतील डायलिसिस केंद्रे पूर्ववत सुरू केल्याचे स्पष्ट केले. या निर्णयामुळे रुग्णांची होणारी गैरसोय दूर होण्यास मदत झाली आहे. धारूर येथील ग्रामीण रुग्णालयातील सेंटरमध्ये डॉ अरविंद निक्ते हे डायलिसिस करताना.

....

जैतापूर

फटाके आणि दिवाळीचे गोड पदार्थ वाटप करण्यात आले. त्यांच्या या सामाजिक उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. दिवाळी हा आनंद, उत्साह आणि प्रकाशाचा सण असला, तरी आर्थिक परिस्थितीमुळे अनेक गरीब कुटुंबांना या सणाचा आनंद मनमोकळेपणाने साजरा करता येत नाही. यंदा दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिक आर्थिक संकटाचा सामना करीत आहेत. अशा परिस्थितीत समाजातील कोणताही घटक दिवाळीच्या आनंदापासून वंचित राहू नये, या उद्देशाने सरपंच छाया भागवत दराडे यांनी हा उपक्रम राबविला. जैतापूर ग्रामपंचायत हद्दीतील अनेक कुटुंबे रोजगारासाठी स्थलांतरित झाली असून, गावात अनेक ठिकाणी केवळ वृद्ध व्यक्तीच वास्तव्यास आहेत. अशा नागरिकांची दिव-ाळीही आनंदात जावी, यासाठी त्यांच्यापर्यंत फराळ पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला. गेल्या आठ वर्षांपासून हा उपक्रम सातत्याने सुरू ठेवण्यात आला असून, यापुढेही ही सामाजिक बांधिलकी जपली जाणार असल्याचे सरपंच सौ. छाया भागवत दराडे यांनी सांगितले. या उपक्रमामुळे वंचित घटकांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला असून, सरपंचांच्या या संवेदनशील आणि समाजोपयोगी कार्याचे ग्रामस्थांसह परिसरातून कौतुक होत आहे. यावेळी परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

....

शॉर्ट सर्किट

मागणी शेतकरी संघटनेने केली आहे. या संकटकाळात, दीपक आलूरे, राहुल मुळे, चंद्रकांत घुगे, गणेश देवशिंगकर,कृषी सहाय्यक अधिकारी पी आर जाधव,पोलीस पाटील जावेद शेख, लाईनमन सुधीर शिंदे,अरविंद गायकवाड यांनी घटनास्थळी भेट देऊन कुटुंबाचे सांत्वन केले. उघड्या पडलेल्या कुटुंबाला आर्थिक मदत देण्याची मागणी शिवसेना तालुकाप्रमुख अमोल जाधव यांनी केली आहे.

....

पद्मावती विभाग

संपूर्ण भारतात बालदिन म्हणून साजरा केला जातो. पंडित नेहरू यांनी देशात धर्मनिरपेक्षतेची भावना रुजविण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. देशाच्या प्रगतीसाठी शिक्षण, विज्ञान आणि विकास या त्रिसूत्रीला त्यांनी विशेष महत्त्व दिले. त्यांच्या दूरदृष्टीमुळे भारताच्या वैज्ञानिक, शैक्षणिक आणि औद्योगिक प्रगतीचा पाया भक्कम झाला. ते एक आदर्शवादी, दूरदृष्टी असलेले आणि विचारशील नेतृत्व होते. पंडित जवाहरलाल नेहरू यांचे लहान मुलांवर अतोनात प्रेम होते. मुलांमध्येच देशाचे उज्ज्वल भविष्य दडलेले आहे, असा त्यांचा ठाम विश्वास होता. मुलांना उत्तम शिक्षण, चांगले संस्कार आणि योग्य संधी मिळाल्यास ते देशाच्या प्रगतीत मोलाचे योगदान देऊ शकतात. शिक्षण, विज्ञान, लोकशाही आणि धर्मनिरपेक्षतेचा विचार त्यांनी देशाला दिला. त्यांचे विचार आणि कार्य आजच्या नव्या पिढीसाठी प्रेरणादायी आहेत. विद्यार्थ्यांनी जिज्ञासू, ज्ञानसंपन्न आणि जबाबदार नागरिक बनावे, हाच बालदिनाचा खरा संदेश आहे. आजची मुले ही उद्याच्या भारताचे भविष्य आहेत, असे प्रतिपादन श्री. दीपक तांदळे सर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. गोपनपाळे सर यांनी केले, तर आभारप्रदर्शन श्री. कांगणे सर यांनी केले. या कार्यक्रमास शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

....

पत्रकार

साजरी करण्याच्या सूचना सामान्य प्रशासना विभागाच्या असून सुद्धा. सोनपेठ मधील तहसील व पंचायत समिती कार्यालय सोडता इतर कार्यालयामधील कार्यालयीन प्रमुख व जबाबदार अधिकारी यांनी शासनाच्या आदेशाची पायमल्ली केल्याच्या आढळून आले. यामध्ये प्रामुख्याने भूमी अभिलेख कार्यालय, महावितरण कार्यालय, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, ग्रामीण रुग्णालय सोनपेठ, उपविभागीय अभियंता ,सार्वजनिक बांधकाम उपविभाग सोनपेठ, सा. दुय्यम निबंध कार्यालयात जयंती दुपार नंतर साजरी करण्यात आली.यामुळेच प्रशासनाला महापुरुषांच्या, नेते यांच्या जयंतीचा विसर पडत चाललाय का..? असा प्रश्न सामान्य नागरिकांतून उपस्थित होत आहे.

....

महापुरुषांचा गौरव

लहुजी विद्रोही सेना जिल्हाध्यक्ष राजेभाऊ खंडागळे आदी मान्यवर उपस्थित होते. सुरुवातीला वस्ताद लहुजी साळवे व पंडित नेहरू यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी बोलताना मान्यवरांनी लहुजी वस्तादांनी बहुजन समाजाला दिलेली क्रांतीची शिकवण आणि पंडित नेहरूंनी देशाला दिलेली आधुनिकतेची दृष्टी यावर प्रकाश टाकला. लहुजी वस्तादांची क्रांती आणि नेहरूंची दृष्टी हाच खरा काँग्रेसचा विचार आहे, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. तरुणांनी या दोन्ही महापुरुषांचे विचार अंगीकारून समाजकारण व राजकारणात पुढे यावे, असे आवाहनही करण्यात आले. या कार्यक्रमास राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे शहर व तालुक्यातील पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा सचिव ॲड. सय्यद याकूब व आभार शेख अहेमद यांनी आयोजकांकडून करण्यात आले.यावेळी राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे ॲड इनामदार साहेब, ॲड शेख अहमद ,रुपेश चव्हाण,लहुजी समियोदिन अन्सारी, शेख मुसा ,शेख फारुख,श्रीनिवास शेळके, फारुख अण्णा, इम्रान मेहंदी, महेश चाळक तसेच लहुजी विद्रोही सेना या सामाजिक संघटनेचे रंजित कसबे, बाप्पा कसबे, सह कार्यकर्ते व समाज बांधव उपस्थित होते.

महाराष्ट्रातील निर्भिड साप्ताहिक रविवार

जगमित्र

विष्णू निवृत्ती कदम
(संपादक जालना, आवृत्ती), ९४२२९९१०३२, ७३८५८९०४४४

PRGI.No.- MHMAR/25/A2848

जालना — रविवार दि.१५ नोव्हेंबर २०२६ — पाने ४ — पान नं.३

ऑटोचालक शेख याकूब यांच्या इमानदारीचे सर्वत्र कौतुक

आजीबाईंचे दीड लाखांचे दागिने व पैसे पोलिसांमार्फत परत

देगलूर । अजीम अन्सारी

प्रामाणिकपणा आजही जिवंत असल्याचा प्रत्यय देगलूरमधील एका घटनेतून आला आहे.शेख याकूब या ऑटोचालकाने आपल्या रिक्षात विसरलेले सोन्याचे दागिने, रोख रक्कम आणि महत्त्वाचे साहित्य कोणतीही मोह माया न बाळगता संबंधित आजीबाईंना परत केले आहे.परत केलेल्या दागिन्यांची व पैशांची अंदाजे किंमत दीड लाख रुपयांपर्यंत असल्याचे त्यांच्या नातेवाईकांकडून सांगितले जात असून, त्यांच्या या तत्परतेचे आणि इमानदारीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मूळ मुखेड तालुक्यातील सावरमाळ येथील एक वृद्ध महिला जनाबाई कोंडीबा अजेवाड ह्या आपल्या माहेरी सुगाव तालुका देगलूर येथे



प्रवास करीत होत्या. आजीबाईंनी देगलूर शहरातून प्रवासासाठी शेख याकूब यांची ऑटो रिक्षा केली होती. आपल्या इच्छित स्थळी उतरताना घाईगडबडीत त्या आपली बॅग रिक्षातच विसरून गेल्या. या बॅगेत सोन्याचे मौल्यवान दागिने, रोख रक्कम आणि कपडे असा सुमारे १.५० लाख रुपये किमतीचा ऐवज होता. काही वेळाने शेख याकूब यांच्या नजरेस ही बॅग पडली. बॅगमध्ये दागिने आणि पैसे असल्याचे लक्षात येताच, त्यांनी क्षणाचाही विलंब न लावता थेट देगलूर पोलीस स्टेशन गाठले. कारण याकूब शेख यांचा मुलगा सुद्धा ठाणे शहर येथे पोलिसात कर्तव्य बजावत आहे. म्हणून प्रथम प्राधान्याने त्यांनी पोलिसांची निवड केली. तथा बॅगेतील सर्व ऐवज पोलिसांच्या स्वाधीन करून घडलेला सर्व प्रकार सांगितला.

पोलिसांनी तत्परता दाखवत याकुब शेख यांच्या कडे असलेल्या बॅगेतील आधार कार्डच्या माध्यमातून त्यांच्या नातेवाईकांना पोलीस स्टेशनमध्ये बोलावून घेतले. पोलिसांच्या उपस्थितीत शेख याकूब यांच्या हस्ते ही बॅग त्यांना सुखरूप परत करण्यात आली. आपला दीड लाखांचा मौल्यवान ऐवज परत मिळाल्याने आजीबाई सह त्यांचे नातेवाईक भावूक झाले होते.त्यांनी शेख याकूब यांना मनापासून आशीर्वाद देत त्यांचे आभार मानले. देगलूर पोलीस प्रशासनानेही शेख याकूब यांच्या प्रामाणिकपणाची दखल घेत त्यांचा सत्कार केला असून, समाजमाध्यमांवरही त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

जालना शहरात नशेच्या 'बटन' गोळ्यांची विक्री करणाऱ्या दोघांना अटक; ७२ हजार ७६० रुपयांचा मुद्देमाल जप्त

अंमली पदार्थ विरोधी पथक व अन्न-औषध प्रशासन विभागाची संयुक्त कारवाई

जालना । ज्ञानेश्वर साळुंके

जालना शहरात मानवी जीवितास अपायकारक असलेल्या नशेच्या 'बटन' गोळ्यांची (नायट्राझीफॅम) अवैधपणे विक्री व वाहतूक करणाऱ्या दोघांना पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. अंमली पदार्थ विरोधी पथक आणि अन्न व औषध प्रशासन विभागाने संयुक्तपणे कारवाई करत तब्बल ९५ नशेच्या गोळ्या, दोन मोबाईल आणि एक दुचाकी असा एकूण ७२ हजार ७६० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

जालना पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू आणि अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी यांनी जिल्ह्यात अवैध दारू आणि नशेच्या पदार्थांची विक्री व वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. या पार्श्वभूमीवर, १३ नोव्हेंबर २०२६ रोजी स्वामी विवेकानंद हॉस्पिटल परिसरात दोन इसम नशेच्या गोळ्यांची चोरटी विक्री व वाहतूक करत असल्याची खात्रीशीर माहिती गुप्त बातमीदारा मार्फत पथकाला मिळाली.

मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून आकाश सुरेश डोंगरे (वय २३, रा. हनुमानघाट, ता. जि. जालना) याला ताब्यात घेतले. त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे ३६० रुपये किमतीच्या एकूण ४५ 'बटन' गोळ्या मिळून आल्या. पोलिसांनी त्याच्याकडे कसून चौकशी केली असता, त्याने या गोळ्या अश्फाक असलम शेख याच्याकडून आणल्याचे सांगितले. त्यानुसार पोलिसांनी तात्काळ कारवाई करत अश्फाक असलम शेख (वय २३, रा. हनुमानघाट, ता. जि. जालना) यालाही ताब्यात घेतले. त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे ४०० रुपये किमतीच्या ५० नशेच्या गोळ्या आढळून आल्या.

जप्त करण्यात आलेला मुद्देमाल: नशेच्या गोळ्या: ७६० रुपये किमतीच्या एकूण ९५ गोळ्या (Nitrosun 10 Tablets), मोटारसायकल: ५०,००० रुपये किमतीची विनानंबरची हिरो एक्सट्रीम गाडी मोबाईल: २२,००० रुपये किमतीचे ओप्पो कंपनीचे दोन मोबाईल एकूण मुद्देमाल: ७२,७६० रुपये. या प्रकरणी अंमली पदार्थ विरोधी पथकाचे पोहेकॉ/ जावेद शेख यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दोन्ही आरोपींविरुद्ध सदर बाजार पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (इछड) तसेच एनडीपीएस (छञ्झड) कायदा आणि औषध व सौंदर्य प्रसाधने कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सदर बाजार पोलीस करत आहेत.

कारवाई करणारे पथक

ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथकाचे प्रभारी अधिकारी सपोनि सचिन इंगेवाड, अन्न व औषध प्रशासन विभागाचे सह. आयुक्त शिवन जाधव, सफौ डोंगरे, पोहकॉ मोराती शिवरकर, विनोद गडधे, महेंद्र सोनवणे, जावेद शेख व दिपक बडुरे यांच्या पथकाने संयुक्तपणे केली आहे.



दिव्यांगांच्या सहा हजार रुपये पेन्शनच्या मागणीला आमदार सुहास शिरसाट यांचा पाठिंबा!

मंत्री अतुल सावे यांच्याकडे निवेदन; अपंग जनता दलाच्या आझाद मैदानावरील आंदोलनाची दखल

जालना । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्यातील दिव्यांग बांधवांना मिळणारे मासिक आर्थिक सहाय्य महागाईच्या तुलनेत अपुरे पडत असल्याने दिव्यांगांचे मासिक पेन्शन ५ हजार रुपयांवरून ६ हजार रुपये करण्यात यावे, अशी लेखी मागणी आमदार सुहास पार्वती त्रिंबकराव शिरसाट यांनी राज्याचे दिव्यांग सक्षमीकरण मंत्री अतुल सावे यांच्याकडे केली आहे. दिव्यांगांच्या सहा हजार रुपये पेन्शनच्या मागणीला त्यांनी पाठिंबा दर्शविला आहे.

अपंग जनता दल सामाजिक संघटनेच्या वतीने मुंबई येथील आझाद मैदानावर दिव्यांगांना मासिक सहा हजार रुपये पेन्शन मिळावे, या प्रमुख मागणीसाठी धरणे आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनातून दिव्यांगांच्या आर्थिक प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यात आले होते. या मागणीला आता आमदार सुहास शिरसाट यांनी पाठिंबा देत मंत्री अतुल सावे यांच्याकडे लेखी निवेदन सादर केले आहे.



महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य आमदार सुहास शिरसाट यांनी दिलेल्या निवेदनात दिव्यांग बांधवांचे मासिक आर्थिक सहाय्य वाढविण्याबरोबरच त्यांच्यासाठी राखीव निधीचा प्रभावी वापर करण्याची मागणी केली आहे. याशिवाय दिव्यांगांना घरकुल सुविधा उपलब्ध करून देणे, स्वयंरोजगारासाठी संधी निर्माण करणे, शिक्षण व आरोग्याच्या सुविधा उपलब्ध करून देणे तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ वेळेत मिळण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याची मागणीही त्यांनी केली आहे.

दिव्यांग बांधवांच्या अडचणी आणि आर्थिक परिस्थितीचा सहानुभूतीपूर्वक विचार करून पेन्शन वाढीसह इतर प्रलंबित मागण्यांवर शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी भूमिका आमदार शिरसाट यांनी निवेदनातून मांडली आहे. आता आमदारांच्या पाठिंब्यानंतर दिव्यांगांचे मासिक पेन्शन सहा हजार रुपये करण्याच्या मागणीवर राज्य सरकार काय निर्णय घेते, याकडे महाराष्ट्रातील दिव्यांग बांधवांचे लक्ष लागले आहे.

पाण्याच्या शोधात भटकणाऱ्या वानराचा झाडावरून पडून मृत्यू; नागरिकांनी हिंदू धर्मपरंपरेनुसार विधिवत अंत्यसंस्कार केले

जालना । प्रतिनिधी

जालना शहरातील प्रभाग क्रमांक ९ मधील डबल जिन परिसरात पाण्याच्या शोधात भटकणाऱ्या एका वानराचा लिंबाच्या झाडावरून खाली पडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली. सध्या उन्हामुळे आणि पाणीटंचाईच्या परिस्थितीमुळे मुक्या प्राण्यांनाही पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. अशाच परिस्थितीत पाण्याच्या शोधात असताना या वानराचा मृत्यू झाल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

या घटनेची माहिती हनुमानभक्त अमरदीप शिंदे यांनी राजू शिंदे यांच्या मोठ्या भावाला दिली. घटनेची माहिती मिळताच राजू शिंदे यांनी पुढाकार घेतला. नागरिकांच्या सहकार्याने वानराची विधिवत पूजा करून हिंदू धर्मपरंपरेनुसार अंत्यसंस्कार करण्यात आले. गांधी चमन, माळीपुरा परिसरातील रेल्वेस्थानक रोडवरील पोस्ट ऑफिस समोर वाघांच्या गजरात वानराला अखेरचा निरोप देण्यात आला.



वानराच्या मृत्यूची बातमी समजताच गांधी चमन परिसरातील नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त करण्यात आली. मुक्या प्राण्यांप्रती माणुसकी, श्रद्धा आणि संवेदनशीलतेचे दर्शन घडवत नागरिकांनी धार्मिक विधी पार पाडले. यावेळी शिवाजी घायाळ, मनोज देशपांडे, मारुती खांडेभराड, बबन जाधव, अशोक पवार, कार्तिक घायाळ, बाळू व्यवहारे, अनिल पिछाडे, विवेक वांगे, वैभव कुदळे, राजू शिंदे, हरिभाऊ वानखेडे, निवृत्ती जाधव, उमेश खरात, अनिल केदारे, उद्धव शिंदे, गणेश घोलप, यश परळकर आदी नागरिक उपस्थित होते.

माणुसकीचा संदेश!

पाण्याच्या शोधात मुक्या जीवांना आपला जीव गमवावा लागत असेल, तर ही केवळ निसर्गाची नव्हे, तर माणुसकीचीही परीक्षा आहे. या घटनेतून मुक्या प्राण्यांसाठी पाण्याची व्यवस्था करण्याची गरज अधोरेखित झाली आहे.

जालन्यात १६ नोव्हेंबरपासून 'हॅपिनेस क्लब' सुरू; मानसिक आरोग्य जनजागृतीसाठी अनोखा उपक्रम!

जालना । प्रतिनिधी

ताणतणाव, चिंता, नैराश्य आणि नकारात्मक विचारांवर मात करून आनंदी व सकारात्मक जीवन जगण्याचा संदेश देण्यासाठी माईंडगुरु फाउंडेशन आणि सरोजिनी देवी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने जालना शहरात सोमवार, १६ नोव्हेंबर २०२६ पासून 'हॅपिनेस क्लब' सुरू करण्यात येणार आहे. या उपक्रमाच्या नियोजनासाठी गुरुवार, १२ नोव्हेंबर रोजी संवाद काउन्सेलिंग, सायकॉलॉजिकल टेस्टिंग अँड वेलनेस सेंटर, जालना येथे बैठक संपन्न झाली. बैठकीत मानसिक आरोग्य जनजागृती, सकारात्मक जीवनशैली, ताणतणाव व्यवस्थापन, नातेसंबंध, आर्थिक व भावनिक स्वास्थ्य आणि समुपदेशनातून समृद्धीकडे या विषयांवर चर्चा करण्यात आली.

यावेळी माईंडगुरु फाउंडेशनचे अध्यक्ष किशोर डी. आघाम, सचिव अमोल आघाम, स्वयंसेवी समुपदेशक भागवत पंडित तसेच सरोजिनी देवी फाउंडेशनचे प्रतिनिधी अरुण खंदारे, अतीक खान, गजानन पांचाळ, दिनेश भुरेवार, बाबासाहेब सारकते, शिवाजी धुळे, किशोर ढोले, नारायण चौधरी, सतीश टाले, उबेद खान व शेख अजमद उपस्थित होते. यावेळी अरुण खंदारे यांनी आपल्या सहकाऱ्यांना हा उपक्रम जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रेरित केले. तसेच किशोर आघाम यांच्या पुढाकाराचे अभिनंदन करून उपक्रमाला शुभेच्छा दिल्या. किशोर आघाम यांनी आजच्या धकाधकीच्या जीवनात मोबाईल, इंटरनेट, सोशल मीडियाचा अतिवापर, वाढती स्पर्धा आणि बेरोजगारी यामुळे मानसिक आरोग्याचे प्रश्न वाढत असल्याचे सांगितले. प्रत्येक वयोगटातील नागरिकांना आनंदी, सकारात्मक व मानसिकदृष्ट्या सक्षम बनविणे हा हॅपिनेस क्लबचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

हॅपिनेस क्लबची माहिती : शुभारंभ : सोमवार, १६ नोव्हेंबर २०२६ वेळ : दर सोमवार ते शनिवार, सायंकाळी ७ ते ८ स्थळ : संवाद काउन्सेलिंग, सायकॉलॉजिकल टेस्टिंग अँड वेलनेस सेंटर, कृष्णा बिझनेस सेंटर, शॉप नं. बी-०६, मम्मादेवी, रेल्वे स्टेशन रोड, नीलम टॉकीजजवळ, जालना. जालना शहरातील विद्यार्थी, युवक, महिला, पालक, नोकरदार आणि ज्येष्ठ नागरिकांनी या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन माईंडगुरु फाउंडेशन व सरोजिनी देवी फाउंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे.

पारडी रोड परिसरातील शेतकऱ्यांसाठी नवीन ट्रान्सफॉर्मर द्या!; निवेदनाद्वारे मागणी

गट क्रमांक ६२ मधील शेतकरी व पशुपालकांची गैरसोय; डीपीडीसी निधीतून नवीन ट्रान्सफॉर्मर मंजूर करण्याची मागणी

मुदखेड । प्रतिनिधी

शहरातील पारडी रोड परिसरातील गट क्रमांक ६२ मध्ये कमी दाबाने वीजपुरवठा होत असल्याने शेतकरी व पशुपालकांना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. या परिसरातील वीजपुरवठ्याची समस्या कायमस्वरूपी मार्गी लावण्यासाठी नवीन ट्रान्सफॉर्मर बसविण्यात यावा, अशी मागणी काँग्रेस पक्षाच्या वतीने नांदेडचे खासदार प्रा. रवींद्र चव्हाण यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.



विद्यमान ट्रान्सफॉर्मरवर अतिरिक्त भार (ओव्हरलोड) येत असल्यामुळे तो वारंवार बंद पडतो. परिणामी, कमी दाबाने वीजपुरवठा होत असल्याने शेतातील पिकांना पाणी देणे, जनावरांच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे तसेच रात्रीच्या वेळी गोठ्यातील जनावरांची देखभाल करणे कठीण झाले आहे. त्यामुळे परिसरातील शेतकरी व पशुपालकांची मोठी गैरसोय होत आहे. या समस्येचे गांभीर्य लक्षात घेता जिल्हा नियोजन व विकास समितीच्या (डीपीडीसी) निधीतून नवीन ट्रान्सफॉर्मर मंजूर करून बसविण्यात यावा. तसेच यासाठी संबंधित महावितरण विभागाला शिफारसपत्र देऊन आवश्यक ते सहकार्य करावे, अशी विनंती निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. याप्रसंगी काँग्रेसचे गिरीश कोत्तावार, सेवा दल तालुकाध्यक्ष गंगाधर पाटील मगरे, गौस भाई मुल्ला, युवक काँग्रेसचे शहर उपाध्यक्ष वेदांत मंगेश शेवटे, कुलदीप मल्लेवार आदी उपस्थित होते.

विद्यार्थीप्रिय प्राचार्य जनार्दन मुळे यांचा सपत्नीक सत्कार; ३० वर्षांच्या शैक्षणिक सेवेचा गौरव

अंबड । ज्ञानेश्वर साळुंके

अंबड तालुक्यातील शेवगा येथील जनजागृती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य जनार्दन श्रीमंतराव मुळे यांच्या ३० वर्षांच्या प्रदीर्घ व समर्पित शैक्षणिक सेवेनिमित्त सेवापूर्ती कृतज्ञता गौरव सोहळा नुकताच (गुरुवारी, दि. १२) उत्साहात पार पडला. याच सोहळ्याचे औचित्य साधून माजी विद्यार्थ्यांच्या दीपावली स्नेहमिलनाचेही आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी मुळे सर यांचा सपत्नीक सत्कार करून त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि विद्यार्थ्यांच्या जडणघडणीतील अमूल्य योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, जालना येथील ह.भ.प. प्रा. प्रमोद कुमावत हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून आय.टी. आय कॉलेजचे माजी प्राचार्य देविदास राठोड उपस्थित होते. याशिवाय जनजागृती विद्यालयाचे शिक्षक दत्तात्रेय औटे, काकडे सर, खोजे सर यांच्यासह शेवगा, धनगर पिंपरी, हरतखेडा, वाघलखेडा, सारंगपूर, मसई परिसरातील माजी विद्यार्थी व प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विद्यार्थ्यांमध्ये रुजवली जीवनमूल्ये

आपल्या तीन दशकांच्या सेवाकाळात प्राचार्य मुळे यांनी केवळ अध्यापनाचे कर्तव्य पार पाडले नाही, तर विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, उच्च संस्कार आणि जीवनमूल्यांची रुजवणूक करण्यावर विशेष भर दिला. एक अत्यंत विद्यार्थीप्रिय शिक्षक आणि कर्तव्यदक्ष प्राचार्य म्हणून त्यांनी विद्यालयाच्या प्रगतीत मोलाचे योगदान दिले आहे. सेवापूर्तीच्या या सुखद क्षणी माजी विद्यार्थी, सहकारी व मान्यवरांनी त्यांच्या गौरवशाली कार्याचा गौरव करत जुन्या आठवणींना उजाळा दिला.

मुदखेडमध्ये काँग्रेसतर्फे पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती उत्साहात साजरी

काँग्रेस पक्ष कार्यालयात काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केले विचार

मुदखेड । प्रतिनिधी

भारताचे पहिले पंतप्रधान आणि आधुनिक भारताच्या जडणघडणीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान देणारे पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती १४ नोव्हेंबर रोजी मुदखेड शहरात उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. मुदखेड तालुका व शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेस अभिवादन करून त्यांच्या स्मृतींना उजाळा दिला. देशाच्या स्वातंत्र्य लढ्यातील योगदान, लोकशाही मूल्यांची जोपासना, आधुनिक भारताच्या उभारणीसाठी त्यांनी केलेले कार्य आणि देशाच्या विकासासाठी घेतलेले निर्णय यांचा यावेळी उल्लेख करण्यात आला.

या प्रसंगी काँग्रेसचे गिरीश कोत्तावार, युवक काँग्रेसचे चालू शहराध्यक्ष मुजीब पठाण, सेवा दलाचे तालुकाध्यक्ष गंगाधर पाटील मगरे, रमेश बोडके, शिवानंद देवके आणि शहर युवक उपाध्यक्ष वेदांत शेवटे यांनी आपले विचार व्यक्त केले. पंडित नेहरू यांचे विचार, त्यांचे राष्ट्रनिर्मितीतील योगदान आणि तरुण पिढीने त्यांच्याकडून घ्यावयाची प्रेरणा याविषयी उपस्थितांनी मनोगत व्यक्त केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अतिक अहमद यांनी केले. यावेळी गिरीश कोत्तावार, मुजीब पठाण, गंगाधर पाटील मगरे, अतिक अहमद, रमेश बोडके, शिवानंद देवके, वेदांत शेवटे, नासीर भाई मुल्ला आदी काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

ह.भ.प. महंत श्री १००८ ब्रह्मलीन कार्तिक स्वामी भारती बाबा यांच्या तपपूर्तीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताह श्रीमद् भागवत कथा

अंबड । ज्ञानेश्वर साळुंके

अंबड तालुक्यातील श्रीक्षेत्र वनारसी पराडा येथे ह.भ.प.महंत १००८ ब्रह्मलीन कार्तिक स्वामी भारती बाबा यांच्या तपपूर्ती (समाधी सोहळ्या) निमित्त ह.भ.प. खडेश्वरी बाबा तुपेवाडी संस्थान, व वनारशी संस्थांनचे मठाधिपती स्वामी संबित चैतन्य बाबाजी यांच्या प्रेरणेने व वनारशी संस्थान कमिटी तसेच पंचक्रोशीतील भाविक भक्तांच्या सहकार्याने कार्तिक शुक्ल ३ दिनांक १२/११/२०२६ पासून अखंड हरिनाम सप्ताह श्रीमत भागवत कथा व सप्तदिन लघु रुद्राभिषेक शिव पंचायत यज्ञ सोहळ्याचे आयोजन मोठ्या उत्साहात करण्यात आले असून श्रीमद् भागवत कथा प्रवक्ते ह.भ.प.ज्ञानेश्वर माऊली शिंदे (यजमान मनोज पाटोळे (जय भद्रा बोरवेल) शिवाजी जऱ्हाड (शिवसेना तालुकाप्रमुख) नबाजी पाटोळे यांच्या अमृतुल्यवाणीतून श्रीमद् भागवत कथेचे निरूपण होणार आहे. पहाटे ४ ते ६ काकडा, ६ ते ७ विष्णुसहस्रनाम, ७ ते १० ज्ञानेश्वरी पारायण व रुद्राभिषेक १० ते १२ भागवत कथा २:३० ते ४: ३० प्रसाद ६ ते ७ हरिपाठ रात्री ८ ते १० हरी किर्तन व नंतर जागरण होईल. दिनांक १२/११/२०२६ गुरवार रोजी ह.भ.प. कृष्णाजी महाराज नवले, (यजमान विष्णू जऱ्हाड, परमेश्वर जऱ्हाड) दिनांक १३/११/२०२६ शुक्रवार रोजी आयुर्वेदाचार्य ह भ प अवधेशानंद महाराज स्वामी, (यजमान डॉ. बाबासाहेब खरात)



दिनांक १४/११/२०२६ शनिवार रोजी ह भ प आत्माराम बाबाशास्त्री कुटे, (यजमान बबन शिंदे प्रभाकर शिंदे) दिनांक १५/११/२०२६ रविवार रोजी उल्हास महाराज सूर्यवंशी, (ज्ञानेश्वर भारती, सुरेश भारती, पांडुरंग भारती, रामेश्वर भारती) दिनांक १६/११/२०२६ सोमवार रोजी ज्ञानेश्वर महाराज कुऱ्हाड (यजमान रघुनाथ जऱ्हाड, शशिकांत कुलकर्णी, कृष्णा जऱ्हाड) दिनांक १७/११/२०२६ मंगळवार रोजी गोपाष्टमी निमित्त सकाळी १० ते १२ नरसिंह महाराज मुकुटकर (यजमान पत्रकार गणेश पाटोळे) व रात्री ८ ते १० ह.भ.प. प्रशांत महाराज मोरे (यजमान शिवनाथ पाटोळे, जामदार सर, वारुदास जोशी) दिनांक १८/११/२०२६ बुधवार रोजी ह.भ.प. बापूसाहेब महाराज मोरे देहूकर (यजमान भाऊसाहेब आरसुळ) दिनांक १९/११/२०२६ गुरुवार रोजी सकाळी ६ ते ८ या वेळेत समाधी सोहळ्यानिमित्त ह.भ.प. दिनकर महाराज चिमणे (यजमान रघुनाथ ढेंबरे) व १० ते १२ या वेळेत भरत गिरीजी महाराज (यजमान गणेश देविदास जऱ्हाड) यांच्या अमृततुल्य वाणीतून काल्याचे किर्तन होणार असून नंतर महाप्रसाद होणार असून तरी सर्व पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी श्रीमद् भागवत कथा श्रवण व किर्तन सोहळ्याचा आवश्य लाभ घ्यावा असे आवाहन स्वामी संबित चैतन्य बाबाजी, वनारशी संस्थान कमिटी व सप्ताह कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.

स्वातंत्र भारताचे पहिले पंतप्रधान भारतरत्न स्व. पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती साजरी

सेवादलच्या वतीने बालकांना फळ व मिठाई वाटप



जालना । प्रतिनिधी

१४ नोव्हेंबर २०२६ शनिवार रोजी प्रदेश काँग्रेस सेवादलचे अध्यक्ष विलास बापू औताडे यांच्या सुचनेनुसार जालना जिल्हा काँग्रेस सेवादलच्या वतीने जिल्हा सामान्य रुग्णालय येथे स्वातंत्र्य भारताचे पहिले पंतप्रधान भारतरत्न स्व. पंडित जवाहरलाल नेहरू यांची १३७ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली आहे.

जालना जिल्हा काँग्रेस सेवादलच्या वतीने स्वातंत्र्य भारताचे पहिले पंतप्रधान भारतरत्न स्व. पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती मोठ्या उत्साहात जिल्हा सामान्य रुग्णालय जालना येथे बालकांना फळ व मिठाई वाटप करून साजरी करण्यात आली आहे. यावेळी सेवादलचे जिल्हाध्यक्ष शेख इब्राहिम, जिल्हा समन्वयक बाबासाहेब सोनवणे, प्रदेश सचिव चंदा ताई भांगडिया, महिला जिल्हा अध्यक्ष अंजली सपकाळ, अमोल भोसले यांच्यासह दिपाली कल्याणकर, बनकर, विनायक बोरूडे यांची उपस्थिती होती.

महाराष्ट्रातील निर्भिड साप्ताहिक रविवार

जगमित्र

संतोष सोनवणे (लातूर जिल्हा प्रतिनिधी)
मो.9673158719

PRGI.No.- MHMAR/26/A2511

लातूर जिल्हा आवृत्ती — रविवार दि.१५ नोव्हेंबर २०२६ — पान नं.४



गुरदाळ तलावातील अवैध पाणी उपशावर प्रशासनाचा 'सर्जिकल स्ट्राईक'!

संयुक्त पथकाची धडक कारवाई; २० विद्युत मोटारींसह लाखोंचा मुद्देमाल जप्त

उदगीर । पाटील मनेश

यंदा संभाव्य भीषण पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर पिण्याच्या पाण्याचे स्रोत सुरक्षित ठेवण्यासाठी प्रशासनाने कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. गुरदाळ येथील साठवण तलावातून अनधिकृतरीत्या पाणी उपसा सुरू असल्याची तक्रार प्राप्त होताच महसूल, पंचायत समिती आणि पोलीस विभागाच्या संयुक्त पथकाने घटनास्थळी धडक देत मोठी कारवाई केली. या कारवाईत जवळपास २० विद्युत मोटारी, वायरचे बंडल, स्टार्टर बॉक्स असा लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

गुरदाळ साठवण तलावातून काही व्यक्तींकडून अनधिकृतरीत्या पाणी उपसा केला जात असल्याची तक्रार प्रशासनाला प्राप्त झाली होती. या तक्रारीची तातडीने दखल घेत तहसीलदार राम बोरगावकर, गटविकास अधिकारी नरेंद्र मेडेवार आणि नागलगाव मंडळ अधिकारी करेप्पा साहेब तसेच नागलगाव मंडळातील सर्व ग्राम महसूल अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली संयुक्त पथकाने तलाव परिसराची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी तलावातून अनधिकृत पाणी उपसा सुरू असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर संयुक्त पथकाने तातडीने कारवाई



करत पाणी उपशासाठी वापरण्यात येणाऱ्या विद्युत मोटारी, वायर आणि स्टार्टर बॉक्स जप्त केले. जप्त करण्यात आलेला मुद्देमाल ग्रामपंचायत अधिकारी, गुरदाळ यांच्या ताब्यात देण्यात आला.

पिण्याच्या पाण्याला प्राधान्य; शेतकऱ्यांना प्रशासनाचे आवाहन!

यंदा भीषण पाणीटंचाईची शक्यता लक्षात घेता साठवण तलावातील संपूर्ण पाणी पिण्याच्या प्रयोजनासाठी आरक्षित करण्यात आले आहे. त्यामुळे कोणत्याही शेतकऱ्याने तलावातून शेतीसाठी अथवा अन्य कारणासाठी अनधिकृतरीत्या पाणी उपसा करू नये. नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी सर्वांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन तहसीलदार राम बोरगावकर यांनी केले.

सदर कारवाई मा.भारतजी बाष्टेवाड जिल्हाधिकारी लातूर यांचे सूचनेनुसार व मा. सुशांतजी शिंदे उपजिल्हाधिकारी उदगीर यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार राम बोरगावकर, गटविकास अधिकारी नरेंद्र मेडेवार, मंडळ अधिकारी करेप्पा, नागलगाव मंडळातील सर्व ग्राम महसूल अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी तसेच पोलीस विभागातील कर्मचाऱ्यांनी केली. पाणी हेच जीवन! पिण्याच्या पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे संरक्षण करण्यासाठी प्रशासन सज्ज झाले असून, पाणीटंचाईच्या काळात जलस्रोतांचा अनधिकृत वापर खपवून घेतला जाणार नाही, असा स्पष्ट संदेश या कारवाईतून देण्यात आला आहे.

लातूर मध्यवर्ती बसस्थानकात दुचाकी आणि खासगी चारचाकी वाहनांचा बिनदिक्कत वावर

लातूर । संतोष सोनवणे

लातूर शहरातील मध्यवर्ती बसस्थानक परिसर सध्या प्रवाशांनी फुलून गेलेला आहे, अशातच स्थानकात दुचाकी आणि चारचाकी वाहन बिनदिक्कतपणे ये-जा करीत असल्याचे दिसून येत आहे. बसस्थानकात दुचाकी आणि चारचाकी खाजगी वाहनांची बेसुमार वर्दळ वाढल्याने प्रवासी हैराण झाले आहेत. रोज सकाळ-संध्याकाळ येथे अपघाताला आमंत्रण देणारी परिस्थिती निर्माण होत आहे.

लातूर हे जिल्ह्याचे ठिकाण असल्याने दररोज हजारो प्रवासी ग्रामीण भागातून शहरात येतात. विद्यार्थी, नोकरदार, महिला, वृद्ध, रुग्ण यांची येथे मोठी गर्दी असते. त्यातच दिवाळी सुट्ट्यांमुळे प्रवाशांची संख्या वाढली



आहे. बसस्थानकाच्या आत बसेस लागतात त्या फलाटापर्यंत खाजगी दुचाकी बिनदिक्कत घुसतात. काही चारचाकी चालक तर आपली कार थेट बसच्या समोर उभी करतात. त्यामुळे चालकाला बस वळवताना कसरत करावी लागते. प्रवाशांना बस पकडण्यासाठी जीव मुठीत धरून धावावे लागते. ही परिस्थिती अत्यंत गंभीर असून एखादा अपघात घडण्याआधी यावर पायबंद घालणे गरजेचे आहे. शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थिनी, महिला प्रवासी, वृद्ध, दिव्यांग यांना दुचाकी, चारचाकी वाहनांचा त्रास सहन करावा लागत आहे.

बसस्थानक प्रशासन, वाहतूक पोलीस यांचे याकडे दुर्लक्ष आहे. प्रवेशद्वारावर सुरक्षा रक्षक नसल्याने कोणीही, कधीही गाडी आत घेऊन येतो. बसस्थानकाबाहेरही परिस्थिती वेगळी नाही. ऑटो रिक्षांची बेशिस्त रांग, टपरीधारकांचे अतिक्रमण, खाजगी जीप-कार यामुळे मुख्य रस्ता पूर्णपणे जाम होतो. बसस्थानकातून बाहेर पडायला बसला १५ ते २० मिनिटे लागतात.

मध्यवर्ती बसस्थानकात खाजगी दुचाकी आणि चारचाकी वाहनांना तात्काळ पूर्ण बंदी घालावी. प्रवेशद्वारावर बॅरिकेड्स आणि सुरक्षा रक्षक तैनात करावेत. खाजगी वाहनांसाठी बसस्थानकाबाहेर स्वतंत्र 'ड्रॉप अँड पिकअप' पॉईंट तयार करावा. नियम मोडणाऱ्या वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करावी, गाड्या जप्त कराव्यात. बसस्थानक परिसरातील अतिक्रमण तात्काळ हटवावे. बसस्थानक हे सर्वसामान्य प्रवाशांच्या सोयीसाठी आहे त्यांची गैरसोय होणार नाही याची दक्षता प्रशासनाने घ्यावी अशी मागणी माझं लातूर परिवाराच्या वतीने करण्यात येत आहे.

शिक्षकांनी सुसंस्कार पिढी घडवली : मंत्री पाटील

अहमदपूर । प्रतिनिधी

तालुक्यातील शिक्षकांनी सुसंस्कार पिढी घडवली असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी अहमदपूर येथे केले ते अहमदपूर येथील संस्कृती मंगल कार्यालय येथे प्रियदर्शनी विद्यालय अहमदपूर येथील मुख्याध्यापक मनोहर मोरे यांचे सेवापुर्ती निमित्त आयोजित गौरव सोहळा व सत्कार समारंभात बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री बाळासाहेबजी जाधव होते. व्यासपीठावर बाळ भगवान शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव बळीराम भिंगोले गुरुजी, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मंचकराव पाटील, पंचायत समिती सभापती सूरजभैय्या पाटील, संस्थेचे



कोषाध्यक्ष अंकुशराव कानवटे, प्रा. भास्करराव माने सर, कुमोदिनीताई जाधव, प्रा. द.मा माने सर, निवृत्तीराव कांबळे, दीपक भराटे सर, नगरसेवक प्रतिनिधी प्रशांत भोसले, दत्तू गुरुजी मोरे, सरपंच बाळासाहेब मोरे, प्राचार्य बाबुराव सैदापुरे सर, पंचायत समिती सदस्य कमलताई सरवदे, भाऊसाहेब शेळके, अतुल जाधव, रामराव खिडसे महाराज यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, शिक्षक बांधव आणि महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यापुढे बोलताना सहकार मंत्री बाबासाहेब पाटील म्हणाले की, शिक्षक हा केवळ ज्ञानदान करणारा नसतो, तर तो अनेक पिढ्यांचे भविष्य घडविणारा शिल्पकार असतो. आपल्या प्रदीर्घ ३३ वर्षांच्या शैक्षणिक सेवेतून विद्यार्थ्यांना ज्ञान, संस्कार आणि जीवनाची योग्य दिशा देण्याचे मोलाचे कार्य श्री. मनोहर मोरे सर यांनी केले आहे. त्यांच्या शैक्षणिक योगदानाचा गौरव करताना ना. पाटील यांनी भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी घेतली भाजप राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांची सदिच्छा भेट

नवी दिल्ली । प्रतिनिधी



भारतीय जनता पार्टीच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी नवी दिल्ली येथे भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीनजी नबीन यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी दीपावली तसेच पवित्र छठपूजेच्या मंगल पर्वानिमित्त डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. भेटीदरम्यान राष्ट्र सेवा, संघटनात्मक बळकटीकरण, पक्ष विस्तार आणि जनकल्याणाशी संबंधित विविध महत्त्वपूर्ण विषयांवर स्नेहपूर्ण व सकारात्मक चर्चा झाली.

या प्रसंगी देशहित, समाजहित आणि संघटनाच्या आगामी वाटचालीसंदर्भात विचारांची देवाणघेवाण करण्यात आली. राष्ट्रीय नेतृत्वाच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पार्टी अधिक प्रभावीपणे जनतेच्या सेवेसाठी कार्यरत राहील, असा विश्वासही व्यक्त करण्यात आला. राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन जी यांची भेट अत्यंत सौहार्दपूर्ण वातावरणात पार पडली असून महाराष्ट्रातील जनतेच्या विकासासाठी आणि संघटन बळकटीकरणासाठी अधिक जोमाने कार्य करण्याची ऊर्जा मिळाली असे मत डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी व्यक्त केले.

औसा तालुका आजी-माजी चेअरमन संघटनेची स्थापना!

अशोक जंगाले अध्यक्ष तर सचिवप दत्तकुमार शिंदे भादेकर यांची सर्वानुमते निवड

औसा । बी.डी.उबाळे

औसा तालुक्यातील सहकार क्षेत्राला अधिक बळकटी मिळावी, आजी-माजी चेअरमन यांच्यात परस्पर समन्वय, विचारांची देवाणघेवाण आणि सहकार्यातून विकासाची नवी दिशा निर्माण व्हावी, विना सहकार नाही उद्धार या उदात्त हेतूने नुकतीच औसा तालुक्यातील आजी-माजी चेअरमन एक दिलाने एकत्र आले. यावेळी झालेल्या बैठकीत सविस्तर चर्चा व विचारविनिमय करून 'औसा तालुका आजी-माजी चेअरमन संघटनेची' सर्वानुमते स्थापना करण्यात आली.

सहकार क्षेत्रात अनेक वर्षे कार्यरत असलेल्या अनुभवी नेतृत्वाचा अनुभव, मार्गदर्शन आणि संघटित शक्ती एकत्र आणणे, तसेच सहकारी संस्थांसमोरील विविध प्रश्न व अडचणींवर सामूहिकरीत्या विचार करून सकारात्मक मार्ग काढणे, हा



या संघटनेच्या स्थापनेमागील प्रमुख उद्देश आहे. या बैठकीत संघटनेच्या अध्यक्षपदी अशोक सोपानराव जंगाले यांची, तर सचिवपदी दत्तकुमार वसंतराव शिंदे भादेकर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. या निवडीमुळे संघटनेच्या माध्यमातून तालुक्यातील सहकार क्षेत्राला नवी ऊर्जा, दिशा आणि बळ मिळेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

एकजूट हीच संघटनेची ताकद, सहकार हाच विकासाचा मार्ग आणि सर्वांच्या हितासाठी सामूहिक प्रयत्न हेच संघटनेचे ध्येय असेल. आज झालेली ही स्थापना केवळ एका संघटनेची सुरुवात नसून, औसा तालुक्यातील सहकार क्षेत्रातील अनुभवी नेतृत्वाला एका व्यासपीठावर आणणारे एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे. यापुढील काळात संघटनेच्या माध्यमातून सहकार क्षेत्राच्या उन्नतीसाठी, संस्थांच्या बळकटीकरणासाठी आणि सभासदांच्या हितासाठी एकत्रितपणे कार्य करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली लातूर शहराच्या पाणी पुरवठा व्यवस्थेचा आढावा

अनधिकृत नळ जोडण्या व मोटार उपशावर कठोर कारवाईचे निर्देश

लातूर । प्रतिनिधी

लातूर शहरातील पाणी पुरवठा व्यवस्था अधिक सक्षम, नियमित आणि पारदर्शक करण्यासाठी आज जिल्हाधिकारी डॉ.भारत बास्टेवाड यांच्या अध्यक्षतेखाली विशेष आढावा बैठक संपन्न झाली. या बैठकीस मनपा आयुक्त राहुल कुलकर्णी, अपर जिल्हाधिकारी, शिल्पा करमरकर, अधिक्षक अभियंता पाटबंधारे रुपाली ठोंबरे, उपायुक्त पंजाबराव खानसोळे, महावितरणचे दाणी एमआयडीसीचे अधिकारी यांच्यासह मनपाचे संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

बैठकीत शहरातील पाणी वितरण, अनधिकृत नळ जोड्या, पाण्याचा अपव्यय सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी यांनी प्रशासनाला खालीलप्रमाणे महत्त्वपूर्ण निर्देश दिले. नियमित पाणी पुरवठा: शहरातील पाणी पुरवठा नियोजित




वेळेनुसार आणि सुरळीत होईल याचे काटेकोर नियोजन करावे. अनधिकृत नळ जोडण्यांचे सर्वेक्षण व कारवाई: संपूर्ण शहरात सर्वेक्षण करून अनधिकृत नळ जोडण्यांचा प्रकार, ठिकाण आणि मालमत्तेची माहिती नोंदवावी. दोषी मालमत्ताधारकांवर दंडात्मक व प्रशासकीय कार्यवाही करावी आणि गरज भासल्यास पोलीस कारवाई करावी. नळ जोडणी नियमितीकरण: शासन व महानगरपालिकेच्या नियमांनुसार पात्र असलेल्या अनधिकृत नळ जोड्या नियमित करण्याची कार्यवाही करावी. मोटारद्वारे पाणी उपशावर बंदी: मुख्य जलवाहिनीवरून थेट मोटार लावून पाणी उपसा करणारे घरगुती ग्राहक तसेच अपार्टमेंटसवर स्वतंत्र तपासणी करून कठोर कारवाई करावी. बोअरवेल तपासणी: शासकीय व खासगी बोअरवेल व पाणी स्रोतांची तपासणी करून पाणी वापराच्या केलेबाबत नियमानुसार कार्यवाही करावी. जनजागृती व आढावा: पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी नागरिकांमध्ये जनजागृती करावी. सुरू असलेल्या सर्वेक्षण मोहिमेला वेग देऊन त्याचा नियमित आढावा घ्यावा. या सर्व सूचनांची तातडीने आणि प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचे आदेश जिल्हाधिकारी यांनी दिले.

दयानंद शिक्षण संस्था व ब्रह्मा कुमारी यांच्या संयुक्त विद्यमाने 'रिचार्ज युअर लाईफ : नई सोच, नई दिशा' कार्यक्रमाचे आयोजन; नियोजन बैठक संपन्न

लातूरकरांना 'ऊर्जेचा डोस'; १८ नोव्हेंबरला बी.के. शिवानी दीदींचे व्याख्यान

लातूर । संतोष सोनवणे



लातूर जिल्ह्यावर ओढवलेल्या दुष्काळाच्या परिस्थितीमुळे आणि वाढत्या मानसिक तणावामुळे नागरिकांमध्ये नकारात्मकता पसरू नये, तसेच प्रत्येक व्यक्तीला संकटांचा सामना करण्याची सकारात्मक ऊर्जा मिळावी, या उद्देशाने दयानंद शिक्षण संस्था आणि प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार, दि.१८ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५:३० ते ८:०० या वेळेत 'रिचार्ज युअर लाईफ : नई सोच, नई दिशा' या भव्य प्रबोधनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमात आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या आध्यात्मिक वक्त्या ब्रह्माकुमारी शिवानी दीदी मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमाच्या पूर्वतयारीसाठी आज दयानंद शिक्षण संस्थेने गठित केलेली विशेष समिती आणि ब्रह्मा कुमारी संस्थेचे सदस्य यांची संयुक्त नियोजन बैठक संपन्न झाली. ब्रह्मा कुमारी संस्थेच्या संचालिका बी.के. नंदा दीदी म्हणाल्या की, कोणतीही परिस्थिती कायमस्वरूपी राहत नसते, हा निसर्गाचा नियम आहे. सध्या आपल्यासमोर दुष्काळाचे संकट उभे राहिले आहे. या परिस्थितीला हतबल होऊन बसण्याऐवजी सर्वांनी एकत्र येऊन त्याचा सक्षमपणे सामना केला पाहिजे. यासाठी शिवानी दीदींचे मार्गदर्शनाचे आयोजन करण्यात येणार आहे. लातूरमध्ये सर्व सुख-सुविधा असतानाही केवळ मानसिक कमजोरीमुळे आत्महत्येसारख्या दुर्दैवी घटना घडत आहेत. प्रत्येकाच्या मनात नवा उत्साह आणि सकारात्मक ऊर्जा भरण्यासाठी शिवानी दीदींना निमंत्रित करण्यात आले आहे. त्यांच्या प्रबोधनामुळे आजवर कोट्यावधी लोकांचे जीवन परिवर्तन झाले आहे.

बी.के. शिवानी दीदींचा परिचय : मूळच्या पुणे विद्यापीठातून इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी (इ.ए.) पदवीधर असलेल्या बी.के. शिवानी. सदिच्छा दूत. मानसिक आरोग्याच्या क्षेत्रातील त्यांच्या कार्याची दखल घेत 'वर्ल्ड सायकियाट्रिक असोसिएशन'ने २०१७ मध्ये त्यांची सदिच्छा दूत म्हणून नियुक्ती केली. भव्य कार्यक्रमासाठी निशुल्क प्रवेश पास उपलब्ध करून दिले जातील. दयानंद शिक्षण संस्था, लातूर अध्यक्ष, सचिव यांनी कार्यक्रमाच्या नियोजनाची माहिती देताना सांगितले की, हा कार्यक्रम विधी महाविद्यालयासमोरच्या भव्य मैदानावर होणार असून, त्यासाठी सूक्ष्म नियोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास ६ हजार पेक्षा अधीक नागरिक उपस्थित राहण्याचा अंदाज असून, त्यांची सर्व सुव्यवस्था दयानंद शिक्षण संस्थेमार्फत करण्यात आली आहे.

कार्यक्रमात शिस्त आणि सुसूत्रता राहावी यासाठी आयोजकांच्या वतीने सुक्ष्मपध्दतीने नियोजन करण्यात आले आहे. लातूरकरांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा आणि सहपरिवार या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन दयानंद शिक्षण संस्था अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी तसेच सचिव रमेश बियाणी आणि ब्रह्मा कुमारी परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

'पोलीस आपल्या गावामध्ये' उपक्रमांतर्गत अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांची मुरुड अकोला येथे भेट; नागरिकांशी साधला संवाद

पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर संभाव्य समस्या, उपाययोजना व नागरिकांच्या सहभागाबाबत केली चर्चा; आतापर्यंत ५२५ गावभेटी, २५ हजार २७७ नागरिकांशी संवाद

लातूर । प्रतिनिधी

लातूर जिल्हा पोलीस दलाच्या वतीने पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर दिनांक १ ऑक्टोबर २०२६ पासून 'पोलीस आपल्या गावामध्ये' हा विशेष उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांशी थेट संवाद साधून आगामी काळात उद्भवू शकणाऱ्या पाणीटंचाईच्या समस्यांची माहिती घेणे, संभाव्य अडचणी समजून घेणे तसेच त्यावर सामूहिक प्रयत्नांतून उपाययोजना करण्याच्या दृष्टीने पोलीस प्रशासनाकडून प्रयत्न केले जात आहेत. या उपक्रमाच्या अनुषंगाने काल दिनांक १३ नोव्हेंबर २०२६ रोजी अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांनी गातेगाव पोलीस



ठाण्याच्या हद्दीतील मुरुड अकोला येथे भेट देऊन स्थानिक नागरिकांशी संवाद साधला. यावेळी आगामी काळात पाणीटंचाईमुळे निर्माण होऊ शकणाऱ्या विविध समस्या, पाण्याची उपलब्धता, नागरिकांना भेडसावणाऱ्या संभाव्य अडचणी तसेच या समस्यांवर मात करण्यासाठी कोणत्या उपाययोजना करता येतील, याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

पाणीटंचाईच्या काळात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, नागरिकांमध्ये समन्वय राहावा तसेच उपलब्ध पाण्याचा योग्य वापर आणि पाणी बचतीबाबत जनजागृती व्हावी, यासाठी नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहनही यावेळी करण्यात आले. 'पोलीस आपल्या गावामध्ये' या उपक्रमाच्या माध्यमातून पोलीस अधिकारी व अंमलदार ग्रामीण भागातील गावांना प्रत्यक्ष भेटी देत असून नागरिकांच्या समस्या जाणून घेत आहेत. केवळ पोलीस आणि नागरिक यांच्यातील संवादापुरता हा उपक्रम मर्यादित नसून गावातील विविध सामाजिक प्रश्न, संभाव्य समस्या आणि त्यावरील प्रतिबंधात्मक उपाययोजना याबाबतही चर्चा केली जात आहे. या उपक्रमाला ग्रामीण भागातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून विशेष म्हणजे महिला नागरिकांचाही या उपक्रमातील सहभाग वाढत आहे. महिला नागरिक मोठ्या संख्येने भेटीदरम्यान उपस्थित राहून आपल्या समस्या मांडत असून चर्चेत सक्रिय सहभाग घेत आहेत. लातूर जिल्हा पोलीस दलाच्या या उपक्रमांतर्गत आतापर्यंत जिल्ह्यातील ५२५ गावांना भेटी देण्यात आल्या असून एकूण २५ हजार २७७ नागरिकांशी थेट संवाद साधण्यात आला आहे. ग्रामीण भागातील नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन त्यावर वेळीच प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी तसेच पोलीस आणि नागरिक यांच्यातील विश्वास व समन्वय अधिक दृढ करण्यासाठी 'पोलीस आपल्या गावामध्ये' हा उपक्रम यापुढेही प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे.

दैनिक जगमित्र कार्यालय, घर क्र. २०, खाडगांव रोड, क्रांतीनगर, विश्वशांती बुद्ध विहारजावळ, लातूर

महाराष्ट्रातील निर्भिड साप्ताहिक रविवार

जगमित्र

बद्रीनारायण घुगे (पुणे जिल्हा प्रतिनिधी)
मो.9922476927 PRGI.No.- MHMAR/26/A4099

पुणे जिल्हा आवृत्ती — रविवार दि.१५ नोव्हेंबर २०२६ — पान नं. ५

भारताचे माजी पंतप्रधान, भारतरत्न पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त महापालिकेच्या वतीने अभिवादन

पिंपरी । प्रतिनिधी

स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान, भारतरत्न पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने त्यांच्या महानगरपालिकेतील प्रतिमेस तसेच नेहरूनगर येथील पुतळ्यास उपमहापौर शर्मिला बाबर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



यावेळी आमदार अमित गोरखे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, नगरसदस्य राहूल भोसले, नगरसेविका अनुराधा गोरखे, सुप्रिया चांदगुडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, सामाजिक कार्यकर्ते संदीपान झोंबाडे, नेताजी शिंदे, युवराज दाखले, नितिन घोलप, बाबासाहेब राठोड, उषामाई वाघमारे यांच्यासह महानगरपालिकेचे विविध विभागांचे प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

पंडित जवाहरलाल नेहरू यांनी स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय सहभाग घेत देशाच्या स्वातंत्र्यासाठी योगदान दिले. स्वातंत्र्यानंतर देशाची लोकशाही व्यवस्था मजबूत करणे, शिक्षण, विज्ञान, उद्योग आणि पायाभूत सुविधांच्या विकासाला चालना देणे यासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. आधुनिक भारताच्या उभारणीतील त्यांचे योगदान देशाच्या इतिहासात सदैव स्मरणात राहील.

जनता शिक्षण संस्थेतील आर्थिक अनियमितता आणि मनमानी कारभारावर चौकशी अहवालात गंभीर निरीक्षणे; दोषींवर फौजदारी कारवाईची मागणी!

पिंपरी । प्रतिनिधी

दापोडी येथील जनता शिक्षण संस्था या सार्वजनिक न्यासाच्या कारभाराबाबत दाखल करण्यात आलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने धर्मादाय आयुक्त कार्यालय, पुणे विभागामार्फत करण्यात आलेल्या निरीक्षक चौकशी अहवालात संस्थेच्या आर्थिक व्यवहारांबाबत, शाळांच्या बांधकामांबाबत आणि निविदा प्रक्रियेबाबत गंभीर निरीक्षणे नोंदविण्यात आली आहेत. याशिवाय संस्थेचे अध्यक्ष जयप्रकाश जगताप आणि सचिव सुभाष जावळे यांच्या कार्यपद्धतीवरही तक्रारदारांनी गंभीर आक्षेप घेतले आहेत. शिक्षक व कर्मचाऱ्यांची कथित मुस्कटदाबी, मनमानी बदल्या आणि मारहाणीच्या तक्रारींमुळे संस्थेच्या कारभाराबाबत नवे प्रश्न उपस्थित झाले आहेत.

संस्थेच्या पदाधिकारी व संबंधित व्यक्तींच्या कारभाराबाबत दाखल तक्रारीनुसार निरीक्षक चौकशी क्रमांक १५२/२०२५ अंतर्गत चौकशी करण्यात आली. या चौकशी अहवालात शाळांच्या विविध बांधकामांमधील निविदा प्रक्रिया, आवश्यक परवानग्या, खर्चाचे विवरण आणि संस्थेच्या निधीच्या वापराबाबत अनेक गंभीर मुद्दे उपस्थित करण्यात आले आहेत. महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० मधील कलम ३९अन्वये अहवाल सादर करण्यासह कलम ८३ अन्वये अभियोजन अथवा खटला दाखल करण्यासाठी पूर्वमंजुरी देण्याची विनंती करण्यात आली आहे.



बांधकाम खर्चात एक कोटींपेक्षा अधिकची तफावत

निरीक्षक अहवालातील निष्कर्षानुसार, संबंधित बांधकामांसाठी अंदाजित खर्च १ कोटी ३७ लाख ३९ हजार ९७७ रुपये अपेक्षित असताना विद्यमान कार्यकारी मंडळाने २ कोटी ३९ लाख ९५ हजार ५०६ रुपये खर्च केल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे तब्बल १ कोटी २ लाख ५५ हजार ५२९ रुपये अतिरिक्त खर्च झाल्याचे निरीक्षक अहवालात नमूद आहे. या अतिरिक्त खर्चाची सखोल चौकशी करून त्याची जबाबदारी निश्चित करण्याची मागणी करण्यात येत आहे.

निविदा प्रक्रियेवर गंभीर प्रश्नचिन्ह

काही बांधकामांच्या निविदा प्रक्रिया योग्य पद्धतीने राबविण्यात न आल्याचे निरीक्षकांनी नोंदविले आहे. काही ठिकाणी निविदा प्रसिद्ध होण्यापूर्वीच कंत्राटदारांकडून निविदा प्राप्त झाल्याचे, तसेच मंजूर निविदेपेक्षा अधिक रक्कम देण्यात आल्याचे अहवालात नमूद आहे. त्यामुळे निविदा प्रक्रियेतील पारदर्शकतेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.

आवश्यक परवानग्यांशिवाय बांधकामे केल्याचा ठपका

शाळांमध्ये नवीन वर्गखोल्या, स्वच्छतागृहे व इतर बांधकामे करताना संबंधित स्थानिक प्रशासनाच्या आवश्यक परवानग्या घेतल्या नसल्याचे अहवालात नमूद आहे. काही बांधकामांसाठी ग्रामपंचायत, नगरपालिका किंवा संबंधित प्राधिकरणाची परवानगी उपलब्ध नसल्याचे निरीक्षकांनी स्पष्ट केले आहे.

संस्थेच्या निधीच्या वापराबाबत गंभीर आक्षेप

शाळा निधीच्या खात्यांचे वर्गीकरण करण्यासाठी ठराव न करता पाच शाळांकडील एकूण २ कोटी ७५ लाख ४२ हजार ५४५ रुपये संस्थेच्या खात्यात वर्ग करण्यात आल्याचे अहवालात नमूद आहे. तसेच आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये आयकर टीडीएस कपात न करणे आणि काही कंत्राटदारांकडून जीएसटी जमा न झाल्यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान झाल्याचे निरीक्षकांनी नमूद केले आहे.

अध्यक्ष आणि सचिवांकडून मुस्कटदाबी होत असल्याचा आरोप

संस्थेचे अध्यक्ष जयप्रकाश जगताप आणि सचिव सुभाष जावळे यांच्या कार्यपद्धतीबाबतही तक्रारदारांनी गंभीर आरोप केले आहेत. संस्थेतील आर्थिक व्यवहार आणि प्रशासनातील अनियमितताबाबत प्रश्न उपस्थित करणारे शिक्षक, कर्मचारी आणि संबंधित व्यक्तींवर दबाव आणणे, त्यांची मुस्कटदाबी करणे तसेच विरोधी भूमिका घेणाऱ्यांना त्रास देण्याचे प्रकार होत असल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे. संस्थेतील लोकशाही पद्धतीने मत मांडण्याच्या अधिकारावर गदा येत असल्याची भावना संबंधितांनी व्यक्त केली आहे.

शंभर टक्के निकाल देणाऱ्या ज्येष्ठ शिक्षिकेच्या वर्षभरात तीन वेळा बदल्या!

संस्थेतील ज्येष्ठ इंग्रजी विषय शिक्षिका कांचन घुले यांच्या बाबतीतही अन्यायकारक प्रशासकीय निर्णय घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे. संबंधित शिक्षिकेने शंभर टक्के निकाल दिलेला असतानाही वर्षभरात तब्बल तीन वेळा त्यांची बदली करण्यात आल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे. शैक्षणिक कामगिरी चांगली असतानाही वारंवार बदल्या का करण्यात आल्या, याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत. या बदल्या हेतुपुरस्सर करण्यात आल्याचा आरोप असून, त्यामागील कारणांची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी करण्यात येत आहे.

प्रदीप कुमार नागवडे यांना मारहाण झाल्याची पोलीस तक्रार

संस्थेचे सचिव आणि अध्यक्ष यांच्याकडून प्रदीप कुमार नागवडे यांना मारहाण करण्यात आल्याचा गंभीर आरोप तक्रारदारांनी केला आहे. या कथित घटनेप्रकरणी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. संस्थेतील मतभेद आणि प्रशासकीय प्रश्न उपस्थित केल्यामुळे अशा प्रकारे दबाव आणला जात असल्याचा आरोपही करण्यात येत आहे. या प्रकरणातील पोलीस तक्रार, उपलब्ध पुरावे आणि संबंधित व्यक्तींचे म्हणणे तपासून सत्य परिस्थिती समोर आणण्याची मागणी करण्यात आली आहे.

दोषींवर फौजदारी कारवाईची मागणी

धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांमध्ये निरीक्षक चौकशी अहवाल, संबंधित पदाधिकाऱ्यांचे खुलासे आणि उपलब्ध दस्तऐवजांचा विचार करून पुढील कायदेशीर कार्यवाही करण्याची विनंती करण्यात आली आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० मधील कलम ३९ आणि कलम ८३ अन्वये आवश्यक कारवाईसाठी पूर्वमंजुरी देण्याची मागणी करण्यात आली आहे. या संपूर्ण प्रकरणातील आर्थिक व्यवहार, बांधकाम खर्च, निविदा प्रक्रिया, शाळांच्या निधीचा विनियोग, शिक्षकांच्या बदल्या आणि कर्मचाऱ्यांशी झालेल्या कथित गैरवर्तनाची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करावी. तसेच चौकशी अहवालातील निष्कर्ष आणि उपलब्ध पुराव्यांच्या आधारे जबाबदार व्यक्तींवर कायद्यानुसार फौजदारी व प्रशासकीय कारवाई करावी, अशी मागणी तक्रारदारांकडून करण्यात येत आहे.

तक्रारदारांची भूमिका

शिक्षण संस्था ही विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि समाजाच्या विश्वासावर उभी असते. संस्थेचा निधी हा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी आणि संस्थेच्या प्रगतीसाठी वापरला जाणे अपेक्षित आहे. मात्र, आर्थिक व्यवहारांमधील अनियमिततेचे निरीक्षण, शिक्षकांच्या वारंवार बदल्या, कर्मचाऱ्यांची कथित मुस्कटदाबी आणि मारहाणीच्या तक्रारी अत्यंत गंभीर आहेत. या सर्व प्रकरणांची निष्पक्ष चौकशी करून सत्य जनतेसमोर आणावे. कोणतीही व्यक्ती पदाचा गैरवापर करून कायद्यापेक्षा मोठी नाही. त्यामुळे दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी तक्रारदारांनी केली आहे.

पाण्या अभावी ऊसाच्या वजनात झाली मोठी घट ऊस पिकालाही दुष्काळाच्या झळा, तोडणी सुरू, कारखाना लवकर सुरू झाल्याने दिलासा

पिंपरी चिंचवड । बद्रीनारायण घुगे

खेड व मावळ तालुक्यात पावसाने पाठ फिरवल्याने खरीप पिकांपाठोपाठ शेतकऱ्यांच्या आर्थिक आधाराचा ऊसही दुष्काळाच्या कचाट्यात सापडला आहे. तालुक्यात ऊस तोडणीला सुरुवात झाली असून, पाण्याअभावी उसाची वाढ खुंटल्याने कांड्यांची जाडी आणि उंची कमी राहिली आहे. परिणामी तोडणी सुरू होताच उसाच्या वजनात मोठी घट जाणवू लागली आहे. वर्षभर मोठा खर्च करून जोपासलेल्या उसातून अपेक्षित उत्पादन मिळण्याची आशा धूसर झाल्याने ऊस उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. मात्र, साखर कारखाने यंदा तुलनेने लवकर सुरू झाल्याने ऊस वेळेत गाळपासाठी पाठविण्याचा मार्ग मोकळा झाला असून, त्यामुळे शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळाला आहे.



हंगामाच्या सुरुवातीला पावसाने काही प्रमाणात साथ दिल्याने उसाची वाढ चांगली होईल, अशी शेतकऱ्यांना अपेक्षा होती. मात्र, त्यानंतर पावसाने दीर्घकाळ दड़ी मारल्याने परिस्थिती बदलली. जमिनीतील ओलावा कमी झाला. विहिरी, बोअरवेल तसेच अन्य पाणीस्रोतांची पाणीपातळी खालावल्याने अनेक शेतकऱ्यांना उसाला गरजेनुसार पाणी देणे शक्य झाले नाही. परिणामी उसाची वाढ खुंटली असून, त्याचा थेट परिणाम आता वजनावर दिसून येत आहे.

उसाचे पीक उभे करण्यासाठी मशागत, बेणे, लागवड, खते, औषध फवारणी, मजुरी आणि पाणी यावर मोठा खर्च करावा लागतो. वर्षभराच्या या खर्चानंतर उसातून चांगले उत्पादन मिळेल आणि आर्थिक भार हलका होईल, अशी अपेक्षा असते. मात्र, यंदा दुष्काळामुळे उसाची अपेक्षित वाढ न झाल्याने उत्पादनाचे गणित बिघडले आहे. तोडणी सुरू झाल्यानंतर या नुकसानीची प्रत्यक्ष जाणीव शेतकऱ्यांना होत आहे. क्षेत्र तेच असले तरी वजन कमी मिळत असल्याने एकरी उत्पादनावर परिणाम होणार आहे. उत्पादन खर्चात फारशी कपात झालेली नसताना उत्पादनात घट होणार असल्याने शेतकऱ्यांच्या उत्पन्नावरही मोठा परिणाम

शासनाने मदत द्यावी

दुष्काळग्रस्त ऊस उत्पादकांच्या नुकसानीकडे शासनाने गांभीर्याने पाहून त्यांना आवश्यक मदत व दिलासा द्यावा, अशी मागणी होत आहे. कारखाने लवकर सुरू झाल्याने ऊस गाळपाचा मार्ग मोकळा झाला असला, तरी दुष्काळाने उसाच्या वजनावर घातलेला घाला शेतकऱ्यांच्या उत्पन्नाला मोठा धक्का देणारा ठरत आहे. खरीप हंगामानेही शेतकऱ्यांना मोठा आर्थिक धक्का दिला आहे. सोयाबीन, भात यासह अन्य पिकांना पावसाअभावी फटका बसला आहे. खरीप पिकांतून अपेक्षित उत्पन्न मिळण्याची शक्यता कमी झाल्यानंतर शेतकऱ्यांची भिस्त उसाच्या उत्पन्नावर होती. मात्र, आता उसालाही दुष्काळाचा फटका बसल्याने शेतकऱ्यांसमोर दुहेरी आर्थिक संकट उभे ठाकले आहे. दुष्काळी परिस्थितीत ऊस शेतात उभा ठेवून आणखी वाढीची प्रतीक्षा करणेही धोक्याचे ठरत आहे. पाण्याची उपलब्धता नसल्याने वाढ खुंटलेल्या आहेत.

सोमनाथ लोखंडे
आदर्श शेतकरी मरकळ

थोर क्रांतीगुरू लहुजी वस्ताद साळवे यांच्या जयंतीनिमित्त महापालिकेच्या वतीने अभिवादन

तीन दिवसांच्या प्रबोधन पर्वाच्या माध्यमातून होणार महापुरुषांच्या विचारांचा जागर; उपमहापौर शर्मिला बाबर यांनी केले उद्घाटन

पिंपरी । प्रतिनिधी

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने थोर क्रांतीगुरू लहुजी वस्ताद साळवे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस व पुतळ्यास उपमहापौर शर्मिला बाबर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



अभिवादनाच्या वेळी आमदार अमित गोरखे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, नगरसेविका अनुराधा गोरखे, सुप्रिया चांदगुडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, जेजुरी संस्थानचे मुख्य विश्वस्त अनिल सौंदडे यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते नाना कांबळे, भाऊसाहेब अडागळे, संदीपान झोंबाडे, संजय धुतडमल, युवराज दाखले, भगवान शिंदे, संजय ससाणे, युवराज दाखले, उत्तम सकटे, मारुती सोनटक्के, आशा शहाणे, सतीश भवाळ, बाळासाहेब रसाळ, संदीप जाधव, सुनिल भिसे, विशाल कसबे, बाळासाहेब खंदारे, वैशाली जाधव, भारती चांदणे, आशाताई शहाणे, केशरताई लांडगे, गणेश कलवले, शिवाजी खडसे, सुहास यादव, अनिकेत साळवे, हरिमान खवळे, भाऊ कसबे, झुंबरताई लांडगे, उषामाई वाघमारे आदी मान्यवर उपस्थित होते. दरम्यान भोसरी विधानसभेचे आमदार महेश लांडगे यांच्यासह विविध सामाजिक कार्यकर्त्यांनी देखील क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी महापुरुषांच्या विचारांचा जागर करणारा लहुजी वस्ताद साळवे तीन दिवसीय विचार प्रबोधन पर्वाचे उद्घाटन उपमहापौर शर्मिला बाबर यांनी केले. प्रबोधन गीतांच्या सादरीकरणातून महापुरुषांचे कार्य, त्यांचे विचार आणि सामाजिक परिवर्तनाचा संदेश प्रभावीपणे मांडण्यात येणार आहेत. महापुरुषांच्या विचारांचे स्मरण करून त्यांचे प्रेरणादायी विचार समाजापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी आळंदी देवाची व ओळख श्री ज्ञानेश्वरी-एक परिवार आयोजित ओळख श्री ज्ञानेश्वरी पुस्तकाच्या तिसऱ्या आवृत्तीचा प्रकाशन

उपक्रमात सहभागी शैक्षणिक संस्था प्राचार्य - अध्यापकांचा सन्मान सोहळा उत्साहात



आळंदी । प्रतिनिधी

येथील कुबेर हॉलमध्ये दिमाखदार वातावरणात श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी आळंदी देवाची व ओळख श्री ज्ञानेश्वरी-एक परिवार आयोजित ओळख श्री ज्ञानेश्वरी पुस्तकाच्या तिसऱ्या आवृत्तीचा प्रकाशन तसेच या उपक्रमात सहभागी शैक्षणिक संस्था पदाधिकारी, प्राचार्य - अध्यापकांचा सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी ओळख श्री ज्ञानेश्वरीची या पुस्तकाच्या तिसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन खेड तालुक्याचे आमदार बाबाजी काळे यांच्या हस्ते झाले.

या प्रसंगी ह.भ.प.डॉ. नारायण महाराज जाधव, संस्थानचे प्रमुख विश्वस्त ह.भ.प. डॉ. भावार्थ देखणे, विश्वस्त ह.भ.प पुरुषोत्तम महाराज पाटील, श्री ज्ञानेश्वर महाराज चरित्र समितीचे अध्यक्ष प्रकाश काळे, देवस्थानचे व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर, ह.भ.प. सुभाष गेटे, ह.भ.प. उमेश बागडे, ह.भ.प. वासुदेव महाराज शेवाळे, माजी नगराध्यक्ष बबनराव कु-हाडे, संस्थेचे विश्वस्त अशोक कु-हाडे, राज्यातून आलेले अनेक संस्थांचे पदाधिकारी आदी उपस्थित होते. ओळख श्री ज्ञानेश्वरी या पुस्तकाच्या तिसऱ्या वृत्तीचे प्रकाशन उत्साहात झाले. मान्यवरांच्या हस्ते अडीचशे शाळां मधील प्रमुखांचा सन्मान माऊलींची मूर्ती, उपरणे ग्रंथराज ज्ञानेश्वरी पसायदानची प्रतिमा, प्रशस्ती पत्रक देऊन करण्यात आला.

श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी, श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्था, श्री ज्ञानेश्वर महाराज चरित्र समिती, आळंदी पत्रकार संघ यांच्या सहभागातून सुमारे सहा वर्षांपूर्वी श्री ज्ञानेश्वर विद्यालयात सुरू झालेला हा उपक्रम आज राज्यातील अडीचशे शाळांमध्ये सुरू झाला आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून ओळख ज्ञानेश्वरी च्या पुस्तकातून शालेय विद्यार्थ्यांना शालेय वयात जीवनमूल्य आणि संस्काराचे धडे दिले जातात. प्रथम सत्रात या प्रसंगी प्रकाश काळे यांनी प्रास्ताविकात या उपक्रमाच्या संदर्भात सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचा आणि उपक्रमाचा हेतू सांगितला. आमदार बाबाजी काळे, डॉ. नारायण महाराज जाधव, डॉ.भावार्थ देखणे, सुभाष गेटे, सत्कारार्थींच्या वतीने काही संस्था चालकांनी मनोगत व्यक्त करत उपक्रमाचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

द्वितीय सत्रामध्ये संत साहित्याचे गाढे अभ्यासक ह.भ.प. अभय टिळक यांचेसह आदी मान्यवरांच्या उपस्थितीत उर्वरित संस्था, प्राचार्य, अध्यापकांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी डॉ.अभय टिळक यांनी आपल्या मनोगतात हा उपक्रम नुसता शाळांच्या संख्येने न वाढता सर्वांगाने वाढावा व त्याचा फायदा विद्यार्थ्यांना व समाजाला व्हावा हे सांगताना या करिता दर तीन महिन्यांनी अध्यापकां करिता कार्यशाळेचे आयोजन करण्याची अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीधर घुंडरे यांनी केले. या निमित्ताने सर्व उपस्थितांना संस्थानच्या वतीने महाप्रसादाचा आयोजन करण्यात आले. उमेश बागडे यांच्या आवाजातील पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

लोणावळ्यातील जुन्या पोलिस ठाण्यावर दगडफेक; अधिकारी कक्षाच्या काचा फोडल्या

लोणावळा । प्रतिनिधी

लोणावळा शहरातील जुन्या पोलिस ठाण्यावर अज्ञात व्यक्तीने दगडफेक करत अधिकारी कक्षाच्या काचा फोडल्या आहेत. ६ जुलै रोजी लोणावळा शहरात मोठ्या प्रमाणात पूर आला होता. त्या पुराचा फटका पोलिस ठाण्यालादेखील बसला. पोलिस ठाण्यातदेखील पाणी घुसल्याने लोणावळा बाजारातील पोलिस ठाण्याचे नवीन इमारतीमध्ये स्थलांतरण करण्यात आले होते. तेव्हापासून बाजार भागातील पोलिस ठाणे हे रिकामे होते. त्याठिकाणी पोलिस नाहीत याचा अंदाज घेत कोणीतरी अज्ञात व्यक्तीने पोलिस ठाण्यावर दगडफेक करत अधिकारी कक्षाच्या काचा फोडल्या आहेत.



लोणावळा बाजार भागातील वाहतूक कोंडी व त्या परिसरात कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या निमित्ताने जुने पोलिस ठाणे हे पुन्हा कार्यान्वित करत त्या ठिकाणी अधिकारी व कर्मचारी नियुक्त करणार असल्याचे प्रभारी पोलिस निरीक्षक महेश विधाते यांनी सांगितले होते. मागील दोन तीन महिन्यांपासून पोलिस ठाणे हे रिकामी असल्यामुळे त्याची साफसफाई व स्वच्छता करत लवकरात लवकर ते पुन्हा कार्यान्वित करण्यात येणार आहे.

ठाणे बंद असल्यामुळे पसरली अस्वच्छता

या अनुषंगाने पोलिस ठाण्याची पाहणी केली असता अधिकारी एक कक्षाच्या काचा कोणीतरी दगडफेक करून फोडल्याचे दिसून आले. सर्व कक्ष हे रिकामे पडल्यामुळे कचऱ्याने भरले आहेत. अधिकारी कक्षाच्या काचांवर ही दगडफेक नेमकी कोणी केली, याबाबत कोणतीही माहिती उपलब्ध नसली तरी झालेली घटना ही निंदनीय आहे. पोलिस हे शहराचे व नागरिकांचे रक्षणकर्ते आहेत. त्यांच्यामुळेच शहरात कायदा व सुव्यवस्था राखली जाते. एखादे पोलिस ठाणे रिकामे आहे अथवा वापरात नाही म्हणून त्यावर दगडफेक करत त्या वास्तूच्या काचा फोडणे हे अतिशय दुर्दैवी व चुकीचा प्रकार असल्याच्या भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

भाऊबीजेच्या ओवाळणीला डिजिटल टच! पाकिटातील पैशांची जागा आता यूपीआय पेमेंटने घेतली

चिंचवड । प्रतिनिधी

भाऊबीज म्हटले की बहिणीने भावाला ओवाळणी करून औक्षण करणे आणि त्यानंतर भावाने बहिणीला प्रेमाने ओवाळणी देणे. ही परंपरा अनेक वर्षांपासून सुरू आहे. मात्र, बदलत्या काळानुसार या परंपरेतही आधुनिकतेची भर पडली आहे. पूर्वी ओवाळणीच्या ताटात पाकीट ठेवून दिले जाणारे पैसे आता मोबाईलच्या माध्यमातून पाठवले जात आहेत.

दिवाळी म्हटली की नवीन कपडे, फराळ, रोषणाई, लक्ष्मीपूजन आणि भाऊबीजेची ओवाळणी डोळ्यांसमोर येते. पूर्वी सणासुदीला नातेवाईकांच्या हातात ठेवले जाणारी पैशाचे पाकीट, त्यातील नवीन नोटा आणि प्रेमाने दिलेले शुभेच्छांना विशेष महत्त्व होते. मात्र, बदलत्या काळानुसार या परंपरेला आता तंत्रज्ञानाची जोड मिळाली आहे.

पेमेंट करताना काळजी घ्या

डिजिटल व्यवहार सोपे झाले असले तरी ऑनलाईन फसवणुकीचा धोका कायम आहे. पैसे मिळवण्यासाठी यूपीआयचा गोपनीय क्रमांक (पिन) टाकण्याची आवश्यकता नसते. अनोळखी व्यक्तीने पाठवलेला क्यूआर कोड स्कॅन करून पैसे स्वीकारण्याचा प्रयत्न करू नये. पैसे पाठवण्यापूर्वी प्राप्तकर्त्याचे नाव आणि रक्कम तपासावी. संशयास्पद दुवे, बनावट भेटकार्डे आणि आकर्षक सवलतीच्या नावाखाली येणाऱ्या संदेशापासून सावध राहावे.

यूपीआय, गुगल पे, फोन पे आणि इतर डिजिटल पेमेंट सुविधांमुळे भाऊबीजेच्या दिवशी पैशाची देवाण-घेवाण अधिक सोपी झाली आहे. नोकरी, व्यवसाय किंवा शिक्षणानिमित्त दूर राहणारे भाऊ-बहीण प्रत्यक्ष भेटू शकत नसले तरी मोबाईलवरून पैसे पाठवून सणांचा आनंद द्विगुणीत करत आहेत. तंत्रज्ञानामुळे व्यवहार सोपे झाले असले तरी भाऊ- बहिणीच्या नात्यातील प्रेम, आपुलकी आणि जिव्हाळा मात्र कायम आहे. पाकिटातील ओवाळणीची जागा आता मोबाईल ने घेतली असली तरी सणामागील भावना आजही तितकीच जिवंत आहे.

पूर्वी भाऊबीजेसाठी आकर्षक पाकिटांना मोठी मागणी असायची आता अनेक जण मोबाईलवरूनच पैसे पाठवण्यास पसंती देत आहेत.

नितीन ब्राह्मणकर, दुकानदार.

भाऊ प्रत्यक्ष भेटून ओवाळणी देतो त्याचा आनंद वेगळाच असतो. मात्र, दूर असताना मोबाईलवरून पैसे पाठवले तरी त्यामागील प्रेम महत्त्वाचे आहे.

weekly 15 Nov 2026_Layout 1 11/14/2026 11:19 PM Page 2

हक्काची जमीन व प्लॉट हडप करणाऱ्यांवर कारवाई करण्याच्या मागणीसाठी आत्मदहन करणार

पारधी बांधवांनी दिला होता महिन्यापूर्वी दिला होता इशारा

धाराशिव/प्रतिनिधी

पारधी बांधवास शासनाने दादासाहेब गायकवाड स्वाभिमान सबलीकरण योजने अंतर्गत दिलेली शेतजमीन तसेच प्लॉट आदींवर गावगुंडानी कब्जा केला आहे. ती जमीन आणि प्लॉट आमच्या ताब्यात द्यावे या मागणीसाठी जयाच्या प्रतीक्षात असलेले आणि पीडित पारधी बांधव उद्या रविवार दि.१५ नोव्हेंबर रोजी कुठेही आत्मदहन करणार असल्याचा इशारा एका



निवेदनाद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दि.५ ऑक्टोबर २०२६ रोजी दिला आहे. मात्र, आतापर्यंत जिल्हा प्रशासनाने कुठलीही कारवाई न केल्यामुळे त्या कुटुंबातील तिघेजण उद्या आत्मदहन करणार असल्याचा निर्वाणीचा इशारा दिला आहे.

कळंब येथील किशन उजव्या काळे यांना कळंब तालुक्यातील भाट सांगवी येथील सर्जेराव तुकाराम गायकवाड यांची ऑक्टोबर २०१२ मध्ये ३ प्लॉट खरेदीखत केले. त्या जागेवर पत्र्याचे शेड मारून कॉलेज कुटुंब राहत होते. मात्र गायकवाड यांच्या वारसदारांनी (पान २ वर)

बीडच्या स्वच्छ व शुद्ध पाणीपुरवठ्यासाठी माजी पाणीपुरवठा सभापती सय्यद इलियास भाऊंनी जलशुद्धीकरण केंद्राची केली सखोल पाहणी!

बीड /प्रतिनिधी

शहरातील सर्वसामान्य नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांना प्राधान्य देत त्यांच्या सुविधांसाठी सातत्याने प्रयत्नशील असणारे, 'आपला माणूस, कामाचा माणूस' अशी ओळख निर्माण केलेले माजी पाणीपुरवठा सभापती तथा एम आय एम पक्षचे बीड नगर परिषदेचे विद्यमान नगरसेवक मा.सय्यद इलियास भाऊ यांनी बीड नगर परिषदेअंतर्गत कार्यरत असलेल्या जलशुद्धीकरण केंद्राला भेट देऊन संपूर्ण प्रकल्पाची सखोल पाहणी केली. शहरातील नागरिकांना स्वच्छ, शुद्ध आणि सुरक्षित पाणीपुरवठा व्हावा, या उद्देशाने त्यांनी या पाहणी दौऱ्यादरम्यान संबंधित यंत्रणेचा सविस्तर आढावा घेतला.

अमृत योजनेअंतर्गत सन २०२२-२३ मध्ये पूर्णत्वास आलेल्या या महत्त्वपूर्ण जलशुद्धीकरण



प्रकल्पाची क्षमता दररोज २५ दशलक्ष लिटर (२५ एमएलडी) इतकी असून, हा प्रकल्प महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बीड यांच्या अंतर्गत कार्यान्वित आहे. विशेष म्हणजे, सय्यद इलियास भाऊ बीड नगर परिषदेच्या पाणीपुरवठा सभापतीपदी कार्यरत असताना त्यांच्या कार्यकाळात या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाने पूर्णत्वाचा टप्पा गाठला होता. त्यामुळे या प्रकल्पाशी त्यांचे विशेष कार्यसंबंध राहिले आहेत.

पाहणीदरम्यान त्यांनी जलशुद्धीकरण प्रक्रियेतील विविध टप्पे, प्रकल्पातील यंत्रणा, परिसरातील स्वच्छता तसेच एकूण कामकाजाची माहिती घेतली. यावेळी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या कामकाजातील अडचणी आणि समस्या जाणून घेतल्या. नागरिकांना गुणवत्तापूर्ण पाणी मिळणे ही केवळ प्रशासकीय जबाबदारी नसून सार्वजनिक आरोग्याशी निगडित अत्यंत महत्त्वाची बाब असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

तसेच जलशुद्धीकरण केंद्राच्या परिसरात स्वच्छता राखणे, पाणी शुद्धीकरण प्रक्रियेत आवश्यक ती दक्षता घेणे, नियमित देखभाल करणे आणि पाण्याच्या गुणवत्तेबाबत कोणतीही (पान २ वर)

नळदुर्ग शहरात मॉडिफाइड सायलेन्सरचा धुमाकूळ!

मोटारसायकलचे सायलेन्सर काढून कर्णकर्कश आवाज करत फिरणाऱ्यांत वाढ

लोहगाव/निजाम शेख

नळदुर्ग-तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग शहरात सध्या मोटारसायकलचे सायलेन्सर काढून किंवा मॉडिफाइड सायलेन्सर बसवून मोठमोठे कर्णकर्कश आवाज करत फिरणाऱ्या दुचाकीस्वारांच्या संख्येत वाढ होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. शहरातील विविध रस्त्यांवरून अशा मोटारसायकली वेगाने जात असताना मोठ्या आवाजामुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

विशेषतः रात्रीच्या वेळी तसेच शाळा, रुग्णालये आणि वर्दळीच्या ठिकाणी अशा मोटारसायकलींच्या आवाजामुळे ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, विद्यार्थी आणि रुग्णांना त्रास होत आहे. काही दुचाकीस्वार मुद्दाम सायलेन्सरमधून मोठा आवाज काढत शहरात फिरताना दिसत आहेत.

नागरिकांना नाहक त्रास, पोलिसांनी कारवाई करण्याची मागणी

वाहनांमध्ये नियमबाह्य बदल करून कर्णकर्कश आवाज निर्माण करणे हे ध्वनिप्रदूषणास कारणीभूत ठरत आहे. त्यामुळे वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या अशा दुचाकीस्वारांवर नळदुर्ग पोलिसांनी लक्ष ठेवून विशेष तपासणी मोहीम राबवावी. मॉडिफाइड मोठ्या आवाजाचा सायलेन्सर काढून घेण्यासह संबंधित वाहनचालकांवर नियमानुसार दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

शहरातील शांतता आणि नागरिकांची सुरक्षितता लक्षात घेता नळदुर्ग पोलिस प्रशासन याकडे गांभीर्याने लक्ष देऊन अशा वाहनचालकांवर कारवाई करणार का ? असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या इशाऱ्यानंतर आरोग्य प्रशासन खडबडून जागे

सहा ही तालुक्यांतील डायलिसिस केंद्रे पूर्ववत सुरू!

धारूर/अतूल शिनगारे

बीड जिल्ह्यातील सहा तालुक्यांमध्ये बंद पडलेली डायलिसिस केंद्रे अखेर पूर्ववत सुरू करण्यात आली आहेत. भ्रष्टाचार निर्मूलन समितीने आक्रमक भूमिका घेत प्रशासनाला रुग्णालयांना टाळे ठोकण्याचा इशारा दिल्यानंतर आरोग्य विभागाने तातडीने हालचाली केल्या. त्यामुळे ११५ हून अधिक गंभीर किडनी रुग्णांना मोठा दिलासा मिळाला आहे.

प्रधानमंत्री राष्ट्रीय डायलिसिस कार्यक्रमांतर्गत (PMNDP) एचएलएल (HLL) एजन्सीमार्फत ही केंद्रे चालविण्यात येत होती. मात्र, मागील दोन वर्षांपासून एजन्सीची बिले थकीत असल्याने केंद्रे बंद ठेवण्याची परिस्थिती निर्माण झाली होती. परिणामी, गरीब रुग्णांना डायलिसिससाठी ५० ते १०० किलोमीटर (पान २ वर)



जैतापूरच्या सरपंचांनी गोरगरिबांची दिवाळी केली गोड!

आठ वर्षांपासून सामाजिक उपक्रमाची परंपरा अखंडितपणे सुरू



धारूर/अतूल शिनगारे

दिवाळीच्या सणाचा आनंद समाजातील गोरगरीब, निराधार आणि वंचित घटकांनाही घेता यावा, या सामाजिक बांधिलकीतून धारूर तालुक्यातील जैतापूर ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ. छाया भागवत दराडे यांनी सलग आठव्या वर्षी दिवाळी फराळ वाटपाचा उपक्रम राबविला. परिसरातील गोरगरीब, निराधार, विधवा, दिव्यांग तसेच वृद्ध नागरिकांना दिवाळी फराळाचे वाटप करून त्यांनी या नागरिकांची दिवाळी गोड केली. तसेच शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, (पान २ वर)

शॉर्ट सर्किट मुळे सात एकर ऊस जळून खाक; तीन शेतकऱ्यांचे स्वप्न भंगले

लाखोंचे नुकसान, आर्थिक मदतीची अपेक्षा..!

अणदूर/प्रतिनिधी

तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील तीन शेतकऱ्यांचे शॉर्ट सर्किट मुळे जवळपास सात एकर ऊस जळून खाक होऊन लाखो रुपयांचे नुकसान झाल्याची दुर्दैवी घटना शुक्रवार दिनांक १३ नोव्हेंबर रोजी सायंकाळी तीन वाजता घडली,ऐन भीषण दुष्काळात,हातातोंडाशी आलेला घास हिरावून घेतला गेल्याने तीनही शेतकरी हतबल झाले आहेत.

आगीचे रौद्र रूप इतके मोठे होते की आग आटोक्यात आणण्यासाठी शेजारील शेतकऱ्यांनी भरपूर प्रयत्न केले मात्र आग आटोक्यात आली नाही आणि अवघ्या काही वेळातच होत्याचे नव्हते झाले.



याबाबत माहिती अशी की, अणदूर येथील शिवारातील धनराज प्रभाकर कुताडे,लक्ष्मण कुताडे,श्याम कुताडे त्यांच्या शेतात दुपारी तीन वाजता शॉर्ट सर्किट मुळे आग लागून,७ एक्कर ऊसाचा कोळसा झाला,दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर संकट कोसळले आहे. या गंभीर परिस्थितीमुळे तिन्ही शेतकऱ्यांचे कुटुंब उघड्यावर पडल्याने ग्रामस्थातून हळहळ व्यक्त केली जात आहे.

या महाभयंकर दुष्काळात हाता तोंडाशी आलेले हे नगदी पिक जळून खाक झाल्याने कुटुंब उघडे पडले आहे. शासन दरबारी याची नोंद घेऊन त्वरित पंचनामे करून शेतकऱ्यांना शासकीय मदत मिळावी अशी (पान २ वर)



शिवसेना नेते माजी मंत्री, अंदाज समितीचे अध्यक्ष आमदार अर्जुन राव खोतकर हे दैनिक जगमित्र या वृत्तपत्राच्या अंकाचे वाचन करताना दिसत आहे सोबत जालना जिल्हा आवृत्ती संपादक विष्णू कदम दैनिक गोकुळ नीतीचे संपादक अर्पणजी गोयल दिसत आहे आमदार अर्जुन खोतकर यांच्या पायाला मार लागल्यामुळे ते आजारी होते त्यामुळे मुंबई येथे जाऊन त्यांची भेट घेऊन चर्चा केली.

संस्कार प्राथमिक शाळा, पद्मावती विभागात पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती साजरी

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

शहरातील पद्मावती शिक्षण संस्था संचलित, संस्कार प्राथमिक शाळा, पद्मावती विभागात भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पद्मावती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. कैलास तांदळे सर होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव श्री. दीपक तांदळे सर उपस्थित होते. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती माधुरीताई तांदळे मॅडम आणि पर्यवेक्षक श्री. इंगळे सर यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पंडित जवाहरलाल नेहरू आणि शिक्षणमहर्षी कै. विठ्ठलरावजी तांदळे सर यांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे श्री. दीपक तांदळे सर यांनी



पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकताना सांगितले की, स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान म्हणून पंडित जवाहरलाल नेहरू यांच्याविषयी प्रत्येक भारतीयाच्या मनात आदराची भावना आहे. त्यांचा जन्म १४ नोव्हेंबर १८८९ रोजी उत्तर प्रदेशातील अलाहाबाद येथे झाला. त्यांचा जन्मदिन (पान २ वर)

पत्रकारांच्या सतर्कतेमुळे काही कार्यालयाने जयंती दुपारनंतर केली साजरी



सोनपेठ/सुभाष सावंत

सोनपेठ तालुक्यातील बऱ्याच शासकीय कार्यालयात भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू (चाचा) यांची जयंती महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग ग परिपत्रकानुसार (उदा परिपत्रक क्रमांक जपु की २०२५/प. क्र १९५/कार्या-जपुक दी२९ डिसेंबर २०२५ आणि तत्सम वार्षिक शासन निर्णयानुसार राज्यातील सर्व शासकीय निमशासकीय कार्यालय शाळा आणि महाविद्यालय मध्ये दि.१४ नोव्हेंबर रोजी पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती त्यांच्या प्रतिमेस पूजन करून पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले जाते प्रती वर्षाप्रमाणे राष्ट्रपुरुष व दिवंगत नेते यांच्या जयंती व पुण्यतिथी (पान २ वर)

राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या वतीने एका व्यासपीठावर दोन महापुरुषांचा गौरव

वस्ताद लहुजी साळवे व स्व.पंडित नेहरू जयंती अभिवादन कार्यक्रम संपन्न



माजलगाव/प्रतिनिधी

क्रांतीचे प्रेरणास्थान वस्ताद लहुजी साळवे आणि आधुनिक भारताचे शिल्पकार स्व. पंडित जवाहरलाल नेहरू यांची संयुक्त जयंती अभिवादन कार्यक्रम राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या वतीने हॉटेल सुखसागर, माजलगाव येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाचे आयोजन शहराध्यक्ष अफरोज तांबोळी यांच्या वतीने शहर व तालुका काँग्रेस कमिटी माजलगाव यांच्या वतीने करण्यात आले होते.सदरील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा काँग्रेस अनुसूचित जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता भाऊ कांबळे हे होते.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून लहुजी विद्रोही सेनेचे अध्यक्ष श्री. भास्कर शिंदे, जिल्हा सरचिटणीस ऍड. इनामदार, (पान २ वर)

लैंगिक समस्या कारणे, सामान्य लक्षणे आणि जीवनशैलीतील बदल-डॉ.जगदीश टेकाळे

लैंगिक आरोग्य हे शारीरिक आणि मानसिक आरोग्याचा महत्त्वाचा भाग आहे. ताणतणाव, झोपेची कमतरता, चुकीची जीवनशैली आणि काही आरोग्य समस्यांमुळे लैंगिक अडचणी निर्माण होऊ शकतात.

पुरुषांमध्ये आढळणाऱ्या सामान्य समस्या इरेक्शनमध्ये अडचण, लैंगिक इच्छा कमी होणे, लवकर वीर्यस्खलन, वीर्याची गुणवत्ता किंवा प्रमाणाबाबत चिंता लैंगिक संबंधांमध्ये आत्मविश्वास कमी होणे.

महिलांमध्ये आढळणाऱ्या सामान्य समस्या

लैंगिक इच्छा कमी होणे,योनीमध्ये कोरडेपणा, संबंधांच्या वेळी वेदना, हार्मोन्समधील बदल, मानसिक ताण व अस्वस्थता

लैंगिक समस्यांची काही सामान्य कारणे- ताणतणाव, चिंता आणि मानसिक दबाव अपुरी किंवा खराब झोप लठ्ठपणा आणि शारीरिक हालचाल कमी असणे. मधुमेह किंवा इतर आरोग्य समस्या दारू, तंबाखू आणि धूम्रपान काही औषधांचे दुष्परिणाम नात्यातील तणाव किंवा संवादाचा अभाव, लैंगिक आरोग्यासाठी जीवनशैलीत हे बदल करा. संतुलित आणि पौष्टिक आहार घ्या. दररोज नियमित व्यायाम किंवा शारीरिक हालचाल करा. पुरेशी आणि चांगली झोप घ्या. ताणतणाव कमी



करण्यासाठी योग, प्राणायाम किंवा ध्यान करा.ङ्क दारू, तंबाखू आणि धूम्रपान टाळा. वजन नियंत्रणात ठेवा. जोडीदाराशी मोकळेपणाने संवाद साधा. समस्या वारंवार होत असल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्या. आहारात काय ठेवावे? हिरव्या पालेभाज्या हंगामी फळे, सुकामेवा योग्य प्रमाणात संपूर्ण धान्य डाळी व कडधान्ये पुरेसे पाणी.

काय टाळावे? जास्त तेलकट व फास्ट फूड दारू तंबाखू व धूम्रपान जास्त साखरयुक्त पेये अतिप्रक्रिया केलेले पदार्थ आजची हेल्त टिप नियमित व्यायाम, संतुलित आहार, पुरेशी झोप आणि ताणतणावावर नियंत्रण यामुळे लैंगिक आरोग्याची काळजी घेता येते. आजचा संदेश ''लैंगिक आरोग्याबद्दल बोलणे लाजेचे नाही. योग्य माहिती, योग्य सवयी आणि गरज असल्यास तज्ज्ञांचा सल्ला घेणे महत्त्वाचे आहे.''

असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी.मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट) न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन, बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात.

मो.९५१८५५१५०३, ९५४५६१५३५२



बीड * वर्ष ०१ ले * अंक ५४ * रविवार जगमित्र हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक, संपादक बालासाहेब जिजाराम कडबाने यांनी जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक रविवार जगमित्र कार्यालय, 'जगमित्र' बाजीप्रभू नगर नेहरू चौक (तळ) परळी वैजनाथ ४३१५१५ जि.बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (साप्ताहिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही.* पीआरबी कायद्यानुसार मजकूर निवडण्याची जबाबदारी यांचेवर राहील.) ई-मेल-jagmitra2010@gmail.com
कार्यकारी संपादक : बिलाल शेख मो.नं.९४२२४०४७४०
PRGI.No.MHMAR/25/A3358

Beed * Year 01 * Issue 54 * Sunday Jagmitra was printed by Balasaheb Jijaram Kadbane, printer, publisher, owner and editor of Jagmitra Offset, near Bajiprabhu Nagar, Nehru Chowk, Parli. Published at Weekly Sunday Jagmitra Office, 'Jagmitra' Bajiprabhu Nagar Nehru Chowk (Bottom) Parli Vaijnath 431515 Dist. Beed (Maharashtra). (Editors do not necessarily agree with the textual news of the daily.e-mail-jagmitra2010@gmail.com Executive Editor : Executive Editor: Bilal Shaikh Mo.No.9422404740
PRGI.No.MHMAR/25/A3358